REGISTERD NO 7,1874

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० ११ माहे अक्टोबर सन १८७४ इ० अंक ४१

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचें अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

### गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाच्या औषधाच्या डब्या विकावयाच्या आहेत. हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो, लावतांनां आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटी प्रमाणें पातळ करून स्नान केल्या नंतर लावावें. किंमत ६ आणे.

हें औषध गजकरणाशिवाय खरूज व नायटे यांजवरही चांगले प्रकारें लागू होतें.

## जाहिरात.

शिवलीलामृत अध्याय ११ व व्यंकटेशस्तोत्र.

असें एकत्र पुस्तक कोणी भाविक गृहस्थानीं आमचे छापखान्यांत टाइपावर छापविलें त्याच्या थोड्यां प्रती विकावयाच्या आहेत. किंमत ४ आणे डाक हाशील०१

## सन १८७५ इसवी सालाकरितां रोजनिसी.

ह्या नांवाची स्मरण वही उत्तम डेमी कागदावर १६ पेजी साच्याची ह्मणजे पाकेट डिक्शनरी सारखी छापून ता० २५ नोव्हेंबरचे सुमारास तयार होईल हींत सरसोलचे दिनचर्या संबंधीं माहिती असोन शिवाय रेलवे, ष्टांप, तारायंत्र, मनीआरर्डर पोस्ट इत्यादि अनेक, नेहमीं जरूर लागणारे उपयुक्त विषयांची कार्या कारण माहिती दिली जाईल हिची किंमत आक्टोबर आखेर पर्यंत आगाऊ आह्माकडे भरणारांस दर प्रतीस ०५ आणे पडतील. दहा प्रती घेणारांस डांक हांशील पडणार नाहीं किरकोळ घेणारांस डांक हाशीलाबद्दल खेरीज दर प्रतीस एक आण्या प्रमाणें जास्त किंमत पाठवावी लागेल.

भाऊ गोविंदसापकर.
ज्ञानचक्षूचे मालक.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० खालीं लिहिलेल्या प्रश्नाचें उत्तर आपले वाचकांपैकीं कोणी कायदे जाणणारे गृहस्थ देतील या हेतूनें पाठविला आहे तर येते अंकांत त्यास जागा मिळण्याची मेहेरवानी व्हावी.

अ. ब. क. ड. ग. हे पांच बंधु एकत्र असतां बनें फपासून व्यापाराकरितां कर्ज घेऊन व्यापार केला पुढें फ चें कर्ज देणें राहिलें त्याबद्दल बनें-१०० रुपयाचा, कनें १२५ रुपयाचा, डनें ७५ रुपयाचा, असे निरानिराळे तीन रोखे करून दिले या तिन्ही रोख्यावरून फनें एकाच कोर्टांत तीन दावे प्रत्येक रोख्यावरून करून प्रत्येक दाव्यांत सर्व अविभक्त बंधु आहेत ह्मणोन अ. ब. क. ड. ग. हे पांचही प्रतिवादी केले आणि उत्तर दिलें कीं दाव्याचे रोख्यापूर्वी ब. क. ड. ग. यांणीं मला फारकत लिहून दिली आहे त्या फारकतीवरून या कर्जाची जबाबदारी मजवर येत नाहीं ही फारकती कोर्टानें खरी ठरवून अ. विभक्त आहे त्यास खेरीज करून ब. क. ड. ग. या चौघा अविभक्त बंधूवर आह्मी निवाडा देतो. असें प्रकारें तिन्ही दाव्याचे फैसले एकाच दिवशीं केले. अ चे फारकतींत मिळकत लिहिली ती आपले एका दाव्याचे फेडीलाही पुरत नाहीं व त्याशिवाय आणखी कांहीं मिळकत ब. क. ड. आणि ग. यांजपाशीं नाहीं ह्मणोन फनें तिन्ही दाव्यांत अपील न करितां बचे रोख्यावरून जो दावा फैसल झाला होता त्यावर मात्र अपील केलें त्यांत दोन मुद्दे आहेत. पहिला ब. क, ड. ग. यांजबराबर अहा अविभक्त आहे. दुसरा ब. क. ड. ग. यांणीं अला दिलेली फारकत कपटाची आहे. हें अपील झाल्या नंतर महिन्या दीड महिन्यानें गनें राहिले दोन्ही दाव्यांतील निवाड्यावर अपील केलें त्यांत मी विभक्त आहे व कर्ज करते समयीं विभक्तच होतो ह्मणोन कर्जाची जोखीम मजवर पडूं नये हा मुख्य मुद्दा आहे.

फचें अपील प्रथम फैल झालें गचें पुष्कळ मागाहून फैल झालें तत्रापि सर्व अपिलांची चौकशी एकाच दिवशीं नेमली गेली आणि हीं सर्व अपिलेंही एकाच कोर्टांत होतीं पाहिले गचे अपिलाची चौकशी होऊन तो विभक्त नाहीं असें दोन्ही आपिलांत ठरलें व अव्वल कोर्टाचे ठराव कायम झाले. या दोन्ही फैसल्याचे वेळेस अ. हा ब. क. ड. ग. बरोबर अविभक्त आहे. व अला मिळालेली फारकत कपटाची आहे या दोन्ही गोष्टीबद्दल विचार होणें अवश्य नसल्यामुळें झाला नाहीं व फनेंही कोर्टास तशी कांहीं प्रार्थना केली नाहीं ह्या गोष्टी ध्यानांत घेऊन खालील प्रश्नाचीं उत्तरें कृपाकरून मिळावींत.

१ गचें अपिलाचा फैसल होतांच फचें अपील कोर्टानीं चौकशीसाठीं घेतलें आतां फचे अपिलांतील मुद्यावर मुकदम्यांतील गुण दोष पाहून कोर्टानीं निर्णय करावा किंवा नाहीं?

२ फनें तिन्ही फैसल्यावर अपील न करितां एका फैसल्यावर केलें ह्मणोन अ. विभक्त नाहीं असी तकरार करण्याचा फचा हक्क नाहींसा झाला कीं काय?

३ गनें केलेलें अपिलांत अचें नाव अपिलेंटांत किंवा रिस्पोंडेंटांत दाखल नसतांही अ. हा बिभक्त कुटुंबांतील एक पुरुष आहे ह्मणोन सिबिल प्रोसिजरकोड कलम ३४८ प्रमाणें किंवा दुसरे कोणतेही नियमाप्रमाणें चौकशी चालत असतां फला तकरार करतां येती कीं काय?

४ जर असी तकरार करतां आली असती तर ती न केल्यानें फनें पूर्वीं केलेले अपिलाचा फैसल होणें बाकीं आहे त्यांत जें त्याचें मागणें आहे त्यास कायद्यावरून प्रतिबंध होतो कीं काय?

५ अपील कोर्टानें प्रथम फचे अपिलाची चौकशी करण्याची होती किंवा गचे अपिलाची करण्याची होती, फचे अपिलाची चौकशी प्रथम झाली असती तर त्याला काय फायदा मिळाला असता?

६ प्रतिवादी अ. ब. क. ड. ग. यांची कोणती मिळकत समाईक किंवा स्वसंपादित आहे या मुद्याविषयीं सदरीं दाव्यांत निकाल होणें जरूरीचें आहे कीं काय? नसले तर विभक्तपणाबद्दल फारकतींत जितका संबंध आला आहे तितका खेरीज करून त्यांत जी मिळकत लिहिली ती समाईक आहे अशी पुढें कोणतेही प्रसंगीं फस तकरार करण्यास प्रतिबंध आहे कीं काय?

७ एका हिंदु कुटुंबांतील पांच बंधूवर एका धनकोनें निरानिराळे प्रकारचें येण्याबद्दल निरानिराळे तीन दावे केले पैकीं एका दाव्यांतून तीन बंधु सोडून द्यावे ह्मणोन धनकोनें अर्ज केला तर सोडलेले तिघे बंधु तिन्ही दाव्यांतील जबाबदारींतून सुटतील किंवा धनकोचे अर्जा प्रमाणें एकांतूनच सुटतील? कळावें तारीख ६ माहे आक्टोबर सन १८७४ इसवी

क्ष.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस —

वि० वि० महाराज आपण आपल्या पत्रद्वारें गरिबाची दाद लावण्याविषयीं व त्यांस ज्या गोष्टीनें सुख होईल ती गोष्ट करण्याविषयीं मनापासून झटतां अशी आपली कीर्ति ऐकून पुढील चार ओळी आपलेकडे लिहून पाठविल्या आहेत तर त्यांस कृपा करून जागा द्यावी.

आह्मा जलचरांस जीवन काय तें पाणी हें आपणास माहितच आहे. तें पुष्कळ असून स्वच्छ असलें तर आह्मा जीवांस कोणत्याही गोष्टीची वाण पडत नाहीं. परंतु जर तेंच पाणी आटत जाऊन वाईट होईल तर मात्र प्राण वाचण्याची मुळींच आशा रहात नाहीं. पत्रकर्ते महाराज, आपण मानव व आम्ही जलचर ह्यामुळें आमची काळजी आपल्यास कशानें असणार ?. परंतु मला वाटतें कीं, पाणी हें जीवन जसें आमचें आहे तसेंच आपलेंही असेल; करितां त्याविषयीं कांहीं तजवीज कराल तर फार बरें होईल. तूर्त तर संकट आह्मांवरच येऊन पडलें आहे. यंदां पर्ज्यन्य जरी बराच बेताचा पडला आहे तरी सांप्रत मोरणा नदींत पाणी पाहिलें असतां आपल्या गुडघ्याला देखील लागणार नाहीं. मग आणखी दोन महिन्यांनीं किती राहील याचा अदमासच करावयास नको. बरें आतां आहे पाणी त्याची तरी व्यवस्था चांगली राहिली आहे काय ! नाहीं. नाहीं. त्यांत वाईट साईट झुडपें उगवलीं आहेत. व तीं केर कचऱ्यास दुसरीकडे फिरकूं न देतां आपल्याच अटकेंत ठेवितात. आणखी कित्येक जनावरें ह्मशी वगैरे त्यांत एकसारख्या डुबत बसतात. त्यामुळें पाणीं रेंदाळून शेणानें व मूत्रानें त्यास चमत्कारिक रंग व वास येण्याचीं चिन्हें दिसतात. व ह्याशिवाय धोबी लोक व कित्येक ग्रामस्थ स्त्रिया व पुरुष घाणेरडीं पांघुरणें आंत धुतात यामुळें पाण्याची जी खराबी होत आहे ती सांगतां पुरवत नाहीं. एडिटरराव, या वरील अनर्थापासून आह्मास किती यातना व दुःख सोसावें लागत असेल तें तर राहूं द्या; परंतु आपल्यास तरी असें पाणी पिणें गोड वाटतें काय ? टाउनहाल बांधणें, सडका करणें, शहरांत स्वच्छता राखणें धर्मशाळा उभारणें, वगैरें जीं आपण लोकोपयोगीं कामें ह्मणतां त्यांत नदीला धरण बांधून पाणी स्वच्छ राखणें हें कलम नाहीं काय ? नसेल तर आणखी दोन महिन्यांनीं आपण कोठून तरी आगगाडींतून पाणी आणून अथवा कोणत्या तरी उपायानें आपला निर्वाह कराल परंतु आह्मा जलचरांस मात्र ईश्वरी क्षोभ होऊन जीव जाई तोंपर्यंत तापलेल्या वाळूची शिक्षा होईल! करितां गरिबांची दया येऊन आलेले संकट टाळण्या विषयीं कांहीं तजवीज केल्यास चिरायु आपल्या धंद्यास यश येण्याविषयीं रात्रंदिवस परमेश्वरापाशीं प्रार्थना करूं. कळावें तारीख ७ माहे आक्टोबर सन १८७४ इसवी.

एक
नदींतील मासा
दहिहंडा वेस

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि० वि० महाराज तारीख १ माहे अक्टोबर रोजीं येथील इं. म. स्कुलांत सायंकाळीं साडेचार वाजण्याचे सुमारास सभा भरली होती. तेथें मीही पहाण्यास गेलों होतों. त्या समयीं जें पहाण्यांत आलें तें आपणास लिहून कळवावें या हेतूनें खालील मजकूर पाठविला आहे तो छापण्याची तजवीज व्हावी.

एडिटरराव सर्व सभासद जमल्यावर मि० मौलवी ताजुदीन साहेब अ० कमिशनर यांची स्वारी आली मग सर्वांनीं आग्रह केल्यावरून ते अध्यक्ष स्थानीं बसले नंतर येथील हेडमास्तर रा० पुरुषोत्तम गणेश यांणीं सभा भरण्याचें कारण सांगितलें तें असें— ज्या समयीं रा. बापूजी रंगनाथ ए० अ० कमिशनर यांची बदली येथून मलकापुरास झाली त्या समयीं सर्वांनीं अशी युक्ति काढिली होती कीं रा० बापु साहेब यांचें येथें चिरकाल नाव रहावें ह्मणून वर्गणी जमा करून एक घंटा आणविण्याचा बेत ठरला होता. त्याप्रमाणें घंटा येऊन तीजला टांगण्याचेंही ठिकाण तयार झालें व त्यांत घंटाही बसविली गेली आहे. व ती वाजण्याची सुरुवात आजपासून व्हावी ह्मणून सर्वांस पाचारण केलें याप्रमाणें सुचविल्यावरून सर्वांनीं अनुमोदन दिलें कीं फार चांगलें आहे. नंतर हेडमास्तर यांणीं सांगितलें कीं या घंटेची वर्गणी जमविणें व तिची इमारत बांधणें या कामीं रा. नारायण गंगाधर सेकंड अ० मास्तर यांणीं आपलें शाळेचें काम वक्तशीर करून राहिलें वेळांत आपलें घरगुती कामाप्रमाणें फार श्रम करून हें काम पुरें केलें याप्रमाणें सुचविल्यावरून सर्वांनीं त्यांचे आभार मानिले. नंतर वर्गणीदारांची यादी वाचल्यावर मि. ताजुदीन साहेब यांणीं सर्वांस सांगितलें कीं मी येथें आल्या दिवसांपासून पहातो आहे कीं येथील हेडमास्तर व त्यांचे हाताखालील अ. मास्तर हे मेहनती असून दिवसानुदिवस ह्या शाळेचें पाऊल पुढें आहे. ह्याप्रमाणें सांगितल्यावर सभा विसर्जन झाली. काय सांगावें एडिटरराव मी ह्या शाळेजवळ गेलों तों मजला भासूं लागलें कीं हें देवालय आहे कीं काय? कारण ह्या घंटेचे खालीं चवघडा वाजत होता. व घंटेच्या इमारतीस फुलांच्या माळांनीं वेष्टण केलें होतें तेणेंकरून त्यास फार शोभा आली होती व जिकडे तिकडे आनंदमय झालें होतें. कळावे लोभ असावा ही विनंती.

तारीख ८ आक्टोबर १८७४
मुक्काम कारंजे

आपला एक बातमीदार.

---


**वऱ्हाडसमाचार**

मिती आश्वीन शुध्द १ शके १७९६


---

विलायतेस ह्या वर्षीं एक मोठें राष्ट्रीय प्रदर्शन होणार व त्याकरितां महाराणी सरकारांतून एक कमिटी नेमिली आहे. या प्रदर्शनांत पुष्कळ अमोल्य वस्तूंचा संग्रह होणार आहे. परंतु त्यांत मुख्यत्वें महाराणी सरकारचे ताब्यांत जीं राज्यें व प्रांत आहेत तेथील मूळचे रहाणारे लोकांचे (नेहेमींचे व सणावार चे पेहेरावासहित) आकृतीचे ठसे, त्यांचे घराचे नमुने, त्यांच्या घरांतील पात्रांचे नमुने, त्यांच्या देवता मूर्त्ति, लढाईचीं शस्त्रें, नौका व होड्यांचे मासले, कृषिकर्माचीं अवजारें, गायनसंबंधी व शिल्प शास्त्रसंबंधी यंत्रें व दुसऱ्या आणखी चमत्कारिक वस्तू या सर्वांच्या नमुन्यांचा संग्रह करून ते विलायतेस रायल आलबर्ट हाल ह्मणून एक महाल आहे तेथें ठेवावा असा प्रदर्शनकमिटीचा हेतु आहे.

ह्या प्रदर्शनाचे बाबदींत हिंदुस्थान सरकारानें सर्व मोठे मोठे लष्करी व मुलकी वगैरे अमलदारांस लिहिलें आहे.

आमचे हैद्राबादचे रेसिडेंट साहेबांसही हिंदुस्थान सरकारानें यासंबंधी एक सर्क्युलर पाठविलें आहे, व त्याप्रमाणें वऱ्हाडांतही त्या प्रदर्शनाचे कमिटीस मदत करण्याविषयीं तयारी चालली आहे. व त्याकरितां एक कमिटी इकडेही नेमिली आहे; व मेहेरबान डनलप साहेब यांस सेक्रेटरी नेमिलें आहे. विलायतेच्या कमिटीस जितकी मदत होईल तितकी करण्याचा रेसिडेंट साहेबांचा मनोदय आहे व त्या कामाकरितां येथें जी कमिटी नेमिली आहे तिच्या स्वाधीन १००० रुपये रेसिडेंट साहेब करणार आहेत.

मे० डनलप साहेब यांणीं वऱ्हाडांतील सर्व खात्याचे मुख्य अधिकारी यांस पत्रें पाठवून त्यांचें ह्या कामीं साह्य मागितलें आहे. वऱ्हाडांतील पुरुष व स्त्रिया यांचे ठसे ओतण्याकरितां लखनौहून एक मनुष्य मागविला आहे. व त्याचें काम करण्याचें ठिकाण बडनेऱ्यास होणार. ब्राह्मण, माळी, कुळंबी, वगैरे खेरीजकरून ज्या जातीचे लोकांचे ठसे ओतावयाचे आहेत त्या जाती येणें प्रमाणें:—

| | |
|---|---|
| राजगोंड. | लाजार. |
| अगरमंडे गोंड. | आंड. |
| कोरकस. | कोलाम. |
| निहाल. | मानभाव. |
| ब्रिंजारी. | कोल्हाटी. |
| ब्रिंजारी लोकांचे भक्त. | |
| हुतकर. | भील |
| रामोशी | कोळी |
| आरख | |

या वरील जातींच्या प्राचीन स्थिति रीतीविषयींच्या खऱ्या माहितीचे निबंध जितके मिळतील तितके फारच उपयोगी पडतील, व या कामांत नेटिव अमलदार तसेच शाळाखात्यांतील गृहस्थ कमिटीस मदत करितील असें सेक्रेटरी इच्छितात.

वर सांगितलेले जे जे लोक ठसे ओतवून देण्याकारितां येतील त्यांचा येण्या जाण्याचा खर्च त्यांस मिळेल असें त्या पत्रांत लिहिलें आहे—

ह्या प्रदर्शनाचा हेतु किती स्तुत्य आहे हें आह्मास लिहिणें नकोच. इंग्रज सरकारचे राज्य ह्या देशांत झाल्यापासून जिकडे तिकडे सुधारणा होत चालली आहे. रानटी अवस्थेतील लोकांतही फेरफार पडत चालला आहे. व ज्याअर्थीं सुधारणेचें पाऊल दिवसें दिवस पुढेंच आहे. त्याअर्थीं कालांतरानें या रानटी लोकांच्या मूळचे स्थितिरीतीचा मागमूससुध्धां रहाणार नाहीं. यास्तव अशा लोकांचे ठसे व त्यांचे पोषाग, त्यांच्या देवता, व त्यांचे हर एक प्रकारचे रीतिभातीचीं वर्णनें ह्या सर्वांचें ज्ञान होण्यास विलायतचे प्रदर्शनांत जो संग्रह करणार आहेत तो फारच उपयोगाचा आहे यांत संशय नाहीं. व अशा अवश्यकतेच्या महाराणी सरकारचे कमिटीस सर्व लोक होईल तितकी मदत करतील असें आह्मास वाटतें.

---

## डफळे लोक

डफळे लोक बंगाल प्रांताच्या ईशान्य दिशेकडील डोंगरी प्रदेशांत रहाणारे आहेत. हे अगदी रानटी स्थितींत आहेत. यांची लढाईचीं शस्त्रास्त्रें पूर्वींच्या रानटी लोकांच्या शस्त्रास्त्राप्रमाणे हडकांची वगैरे केलेलीं आहेत. ह्या लोकांस युध्धकलेची अगदीं माहिती नाहीं. आज कित्येक दिवस हे लोक ज्या डोंगरांत रहतात त्या खालील सुपीक प्रदेशावर हल्ला करून आपली उपजीविका करीत आहेत. ह्या कारणावरून सभोंवतील लोक ह्यांच्या त्रासानें अगदी गांजून गेले आहेत. वास्तवीक गरीब लोकांनीं मेहेनत करून आपल्या उपजीविकेची सोय करावी आणि या भुट्टे चोरांनीं आयत्या पिठावर रेघोट्या याप्रमाणें त्यांस लुटावें हा न्याय कोण? गेले सालीं या लोकांमध्यें डांग्या खोकल्याची साथ उठली होती. व ही साथ त्या प्रदेशांत अमरटाला येथील लोकांच्या चेटकानें झाली असा त्यांचा समज झाल्यावरून सदरहू खेड्यावर ह्या लोकांनीं हल्ला करून तेथून पुरुष बायका आणि मुलें मिळून एकंदर १४ मनुष्यें धरून नेलीं. या लोकांस ते गुलामाप्रमाणें वागवित आहेत. व त्यांचे फार हाल करीत आहेत.

हल्लीं इंग्रज सरकारचा हेतु ह्या धरून नेलेल्या लोकांस सोडविण्याचा आहे. ह्याकरितां सरकार चांगली तयारी करीत आहे. हे लोक अगदी रानटी असतां व यांच्या जवळ शस्त्रास्त्रें वगैरे कांहीं नसतां आमचे सरकार इतकी तयारी कां करीत आहे कोण जाणें. तिकडील कांहीं माहितगार लोक ह्मणतात कीं कदाचित् कांहीं जास्ती प्रसंग येईल. व असेंही ह्मणतात कीं हे लोक फार मजबूत आहेत. कसेंही असो. सरकारानें आधीपासूनच सावधगिरीनें रहावें हें फार चांगलें आहे.

ह्या लोकांची चांगली खोड मोडण्याच्या हेतूनें इंग्रज सरकार २ तोफा व ९०० लोकांची एक टोळी पाठवित आहे. ईश्वर करो व ह्या भुट्टे चोरांची चांगली खोड मोडो व गरीब बिच्याऱ्या धरून नेलेल्या लोकांची दास्यत्वापासून मुक्तता होऊन आमचे सरकारास यश येवो ह्मणजे झालें.

---

## स्तुत्य उद्योग.

नेटिव वर्तमानपत्रांत जे मजकूर येतात ते सरकारास कळावे याकरितां मुंबई इलाख्यांत तसेंच बंगाल इलाख्यांत सरकारानें रिपोर्टर नेमिले आहेत. परंतु कोण कोणचे मजकूर सरकारचे कानावर जातात हें लोकांस कळत नाहीं. फक्त कांहीं सरकारी अधिकाऱ्यांस मात्र रिपोर्टराकडून ते समजतात. इतके दिवस बंगाल इलाख्यांत नेटिव पत्रांतील मजकुराबद्दल जे सरकारास रिपोर्ट जात असत ते वर्तमानपत्रकर्त्यासही मिळत असत परंतु अलिकडे वर्तमानपत्रकर्त्यांस ते पाठवूं नयेत फक्त कांहीं नियमित सरकारी अधिकाऱ्यांस मात्र ते पाठवावे असा सरकारचा ठराव झाला आहे. वास्तवीक पाहिलें असतां हे रिपोर्ट सर्व लोकांस व सर्व युरोपियन तसेंच नेटिव अमलदारांस कळविल्यापासून सरकारचें काय नुकसान होत असेल हें आह्मास समजत नाहीं. ह्या ठरावावरून बंगाल्यांतील अमृतबझारपत्रिका या वर्तमानपत्राचे कर्ते असें ह्मणतात कीं, जर या कामीं सरकार आपणास मदत करीत नसेल तर आपण स्वतःच या कामीं उद्योग केला पाहिजे. सरकारचे मनांत आमचीं गाऱ्हाणीं ऐकण्याचीं नसलीं तर आपण बळेंच तीं त्यांच्या कानावर घातलीं पाहिजेत. कित्येक युरोपियन लोक आपणास आपण प्रत्येक व्यक्ती खुद्द महाराणी सरकारच आहोत असें समजतात व नेटिव वर्तमानपत्रकर्ते लोकांचे मनांत फितूर उत्पन्न होईल असे मजकूर लिहितात अशी त्यांची समजूत असते. परंतु ही त्यांची चूक आहे. आह्मास जर लोकांचे मनांत सरकारचे विरुद्ध ग्रह उत्पन्न करणें आहेत तर आम्ही आपले मजकूर इतके उघड रीतीनें लिहूं काय? व त्या मजकुराचें भाषांतर सरकारास समजावें इतके आह्मी उत्कंठित होऊं काय? कधीं नाहीं तर आमचें ह्मणणें सरकास कळावें हीच आमची इच्छा आहे. इंग्रज सरकारचें राज्य जावें अशी आमची बिलकूल इच्छा नाहीं. आह्मास जें काय पाहिजे तें हेंच कीं राणी सरकारांनीं आह्मांस आपले प्रजेची प्रजा असें न समजतां आपलीच प्रजा आहे असेंच समजून वागवावें. आतां ज्या लोकांस आमच्यावर बलात्कारानें अम्मल करणें आवडतें व आम्हीच राणी सरकार असे जे होऊं पहातात त्यांस मात्र आम्ही जें जें लिहितों त्यांतील प्रत्येक शद्ब फितुराचा आहे असें वाटतें याजकरितां आपणास काय पाहिजे, काय नको आहे हें सरकारास आपणास कळविलेंच पाहिजे व हा हेतु मनांत धरून आह्मी लवकरच रिपोर्टरचें काम स्वतः करणार आहोत. बंगाल्यांतील तसेच दुसरे प्रांतांतील नेटिव्ह वर्तमानपत्रकर्त्यांचे मजकुराचा गोषवारा करून आह्मी एक पत्र काढणार आहोत व ते कांहीं सरकारी आमलदारांस तसेंच हिंदुस्थानांतून विलायतेस परत गेलेल्या साहेबलोकांस व पार्लमेंट सभेच्या मेंबरांस वाटणार आहोत. या कामाकरितां आमचे

देशबांधवांचे मदतीची आह्मी इच्छा करीत नाहीं. आमचा उद्योग सिध्धीस जाण्यास ईश्वर आह्मास साह्य करील.

याचे नावस्तुत्य व अवश्य उद्योग. असले हेतु आपले लोकांचे मनांत येऊ लागले आहेत. त्याजवरून हिंदुस्थानचा ऊर्जितकाळास आरंभ झाला आहे असें समजलें पाहिजे.

## वऱ्हाड.

पंदा मुंबईच्या माट्रिक्युलेशनच्या परीक्षेकरितां वऱ्हाडांतून ११ उमेदवार जाणार आहेत पैकीं अकोल्याहून ४ व उमरावतीहून सात.

पावसानें अगदींच टाळा दिला. आज तीन दिवस सकाळीं चांगली थंडी पडूं लागली आहे. कांहीं ठिकाणीं आणखी एक दोन पावसांची जरूरी आहे.

ता० ६ सप्तंबरच्या रेसिडेन्सिआर्डर वरून.

खालीं लिहिलेल्या गृहस्थांस पुन्हा उमरावतीच्या म्युनिसिपाल कमेटीचे मेंबर नेमिलें.

मि० बुएल
,, डुगल
,, नाना चिमोटी
,, रामधन
,, मनुलाल

उमरावतीस असिस्टंट व एकस्ट्रा असिस्टंट कमिशनरांच्या लोअर व हायर स्टांडर्डच्या परीक्षा तारीख१९ अक्टोबर रोजीं होणार.

परीक्षा घेण्याकरितां खालीं लिहिलेल्या गृहस्थांची कमेटी नेमिली आहे.

प्रेसिडेंट

लेफ्टिनेंट करनल नेंभार्ड साहेब वऱ्हाडचे रेविन्यु कमिशनर

मेंबर्स

ले० क० ए एच पिलिट पोलिसचे इन्स्पेक्टर जनरल

मे० सि० हार्डन साहेब उमरावतीचे डिपुटी कमिशनर

डा० सिंक्लेर विद्याखात्याचे डायरेक्टर.

डिपुटी कमिशनरांनीं परीक्षा देणाऱ्या लोकांचीं नावें तारीख ३० सप्तंबर सन १८७४ चे आंत पाठवावीं. व ते हायर किंवा लोअर स्टांडर्डची परीक्षा देणार ते लिहावें.

डिपुटी कमिशनरांनीं जे गृहस्थ परीक्षेस जात असतील त्यांनीं परीक्षेच्या पूर्वी ६ महिन्यांत जे फैसल केले असतील त्या पैकीं कोणचे तरी दिवाणी व १२ फौजदारी मोकदमे परिक्षेच्या पूर्वी ८ दिवस प्रेसिडेंटाकडे पाठवावे.

डे० क० नीं जे उमेदवार परिक्षेस जात असतील त्यांच्या चालचलणुकीविषयीं थोडक्यांत हकीकत लिहून पाठवावी.

रा. रा. श्रीकृष्ण नरहर, मि. इलियट काडेन व मि. निकोलेट साहेब काम पहाण्याकरितां येथें येणार व मि. दस्तुर बहिमनजी जामासजी हे बुलढाण्यास जाणार असें समजतें.

खामगांव तहशिल कचेरींतील कारकून गोपाळ गणेश ह्यास मिसलींचे कांहीं कागद हरवले ह्मणून सस्पिंड केलें आहे.

रा. रा. सखाराम दत्तात्रय जळगांवचे तहशिलदार यांस पेनशन देणार व त्यांचे जागीं मि. शाबास खान ह्यास नेमणार.

अकोला हुजूर नाझर यांस ७६ रुपये पगार झाला व त्या वर्गावर्गीत रा. राघव यादव यांस ३०. रुपयाचे ४० केले व त्यांचो ३० ची जागा रा. नारायण सखाराम यांस दिली.

हैद्राबाद स्टेट रेलेच्या समारंभाकरितां वऱ्हाडांतून मे. बेल साहेब, क्या. बुलक साहेब, डा० सिंक्लेर साहेब, मि. इलियट साहेब, क्या. जेमिसन सा., मे. बुषबी साहेब, व क्या. मेकंजी साहेब असे गेले आहेत.

आह्मांस लिहिण्यास आनंद वाटतो कीं मेहेरबान डायरेक्टर साहेब यांनीं अशी शिफारस केली आहे कीं रा. रा. श्रीराम भिकाजी जटार बी. ए यांस हायस्कुलच्या हेडमास्तरची कायमची जागा द्यावी त्याजवर रिविन्यु कमिशनरांनीं चांगला अभिप्राय दिल्याचे ऐकतों.

## जाहिरात.

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY.
OPENING OF THE NIZAM'S STATE RAILWAY.

ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

### निजाम स्टेट रेलवेची सुरवात.

या लेखाच्या द्वारानें अशी जाहिरखबर देण्यांत येते कीं, तारीख ९ वी आक्टोबर सन १८७४ इसवी रोजीं व त्या दिवसानंतर निजाम स्टेट रेलव रस्ता सर्व प्रकारच्या व्यापाराकरितां वाडी येथील जंकशनावर या रेलवेशीं लागून तेथून स्टेट लाइनची हैदराबाद, आणि सिकंदराबाद आणि दरम्यानचीं सर्व स्टेशनें यांवर सुरू होईल.

स्टेट लाइनवरील काम सध्या आणि पुढें जाहिरखबर येई तोंपर्यंत, या कंपनीकडूनच करण्यांत येईल. आणि उतारू, त्यांच्या बरोबरचें जावयाचें सामान, घोडे गाड्या, कुतरे व दुसरे प्राणी, पार्सलें आणि सर्व प्रकारचा माल नेण्या आणण्याविषयीं या रेलवे कंपनीचे जे नियम व ज्या शर्ती त्या त्या वेळेस अमलांत असतील त्याप्रमाणें आणि या कंपनीचे जे दरदाम अमलांत असतील त्याप्रमाणेंच नेला आणला जाईल-

हरएक प्रकारच्या व्यापाराची नोंदणी, वाडी मार्गानें निजाम स्टेट रेलवेचीं स्टेशनें आणि या कंपनीचीं स्टेशनें व दुसऱ्या ज्या कंपन्याशीं तहत नोंदणी करण्याबद्दल व्यवस्था केलेली आहे त्यांचीं स्टेशनें यांच्या दरम्यान पाहिजे तर तहत केली जाईल.

स्टेशनें, ट्रेनच्या वेळा वगैरेबद्दल माहिती पाहिजे असेल तर आजच्या तारखेचें स्टेट रेलवेचें टाइमबिल स्टेशनावरून लावलेलें आहे तें पहावें. दरदाम वगैरेबद्दल आणि दुसऱ्या विशेष गोष्टींबद्दल माहिती स्टेशनावरून मिळेल अथवा खालीं सही करणाराकडे अर्ज केला असतां मिळेल.

हेनरी कांडर,
जनरल ट्राफिक मानेजर.

मुंबई, ता. ३ री
आक्टोबर सन १८७४ इसवी.

## नोटिस.

नोटिस—बाळाजी नानाजी देशपांडे कुळकर्णी कसबे चांढोळ तालुके चिखली जिल्हा बुलढाणें यांस खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते की कसबे चांढोळ येथील कुळकर्णीपणाचीं सालें आपणा उभेता पर्की चौघा बिरादरांचे सम्मतानें दोन दोन ठरल्याप्रमाणें एक साल सु० सन १२८३ फसलीचे तुह्मी वहिवाटलें आहे हल्लीं सालमजकुरां सु० सन १२८४ फसलीस माझे साल आलें असून तुह्मास मी दोनच्यार वेळा चौघा बिरादरांसमक्ष दप्तर मागितलें तथापि तुह्मी न मानतां सदहू दप्तर दिलें नाहीं. सबब मी सरकारांत फिर्यादही केली आहे. पुढें जो निकाल होईल तो खरा. पंतु हल्लीं या नोटिसीवरून तुह्मास कळवितो कीं ही नोटिस पावल्यापासून ८ आठ दिवसांत सदरहू कुळकर्णीपणाचें दप्तर तुह्मी मजला दिल्यास उत्तम आहे. अगर वर लिहिलेल मुदतीस दप्तर न दिल्यास मौजे झसले वुडुख येथील कुळकर्णीपणाचें दप्तर माझे वहिवाटीस आहे त्याजवर तुमचा अक्षयी वारसा रहाणार नाहीं. हें खूप समजावें. कळावें तारीख १० माहे आक्टोबर सन १८७४ इसवी.

( सही )बाळकृष्ण गणेश देशपांडे कुळकर्णी दस्तुर खुद.

## वर्तमानसार

मुंबईस तारीख ३ रोजीं २० व्या काळ्या पलटणीच्या शिपायांमध्यें व पोलिसच्या शिपायांमध्यें तंटा झाला याची हकीकत सदरहु तारखेस क्राफर्ड मार्केटासमोरून ह्या पलटणींतील कांहीं लोक त्यांच्या नेहेमीच्या पलटणीच्या रीतीप्रमाणें जात होते इतक्यांत पाठीमागून गाडींतून कांहीं पारसी गृहस्थ आले. गाडी हाकणारानें पैस पस एक दोन वेळा ह्मटलें व तशीच गाडी हाकली ती सिपायांच्या टांगेमधून गेली. गाडीचा धक्का एका सिपायास लागून तो खालीं पडला व तंट्यास प्रारंभ झाला. एक सिपायी गाडीवर चढला. दुसऱ्यानें गाडी हाकणारास मारण्याचा झपाटा लावला गाडींतील पार्शी लोक आपला जीव घेऊन क्राफर्ड मार्केटमध्यें गेले. इतक्यांत कांहीं पोलिसचे सिपाई तंटा तोडण्यास आले आणि त्यांची व पलटणींतील सिपायांची मारामारी होण्यास प्रारंभ झाला. ही मारामारी पहाण्यास सुमारे दोन हजार लोक भोंवतालीं जमले होते. पोलिसचे लोक पुष्कळ जमल्यानें पलटणींतील लोकास भांडण सोडून जावें लागलें. पलटणींतील लोकांजवळ हत्यारें नव्हतीं ह्मणून बरें झालें नाहीं तर केवढा अनर्थ झाला असता नकळे. पलटणींतील लोकांपैकीं चार असामीस चौकशीकरितां नेलें आहे. ह्या मारामारीमध्यें पोलिसच्या लोकांसुद्धां पुष्कळ दुखापत झाली.

लार्डनार्थब्रुक यांची प्रकृती बिघडली होती ती आतां बरी आहे.

मुंबईचे पोलिस कमिशनर मि० सौटर साहेब यांस तेथील म्युनिसिपाल कमेटीचे मेंबर नेमिलें.

कान्स्टांटिनोपल येथें बसोऱ्याहून दोन स्त्रिया आल्या आहेत त्यांस पुरुष्याप्रमाणें दाढ्या आहेत. त्या दोघी बहिणी आहेत. त्यांनीं तेथील सुलतानाकडे आपणास कांहीं नेमणूक असावी ह्मणून अर्ज केला आहे.

मुंबईच्या हायकोर्टाचे चीफ जस्टिस अनरेबल सर मायकेल वेस्ट्राप हे तीन महिन्याचे रजेवर जाणार व त्यांचे जागीं आनर चार्लस सारजंट यांस नेमणार.

अयोध्येस चीफ जस्टिसची जागा करणार आहेत.

उदेपुरचे महाराणे अतिशय आजारी आहेत.

ह्या सालामध्यें गुडघेमोडीचा आजार पुष्कळ होता.

पुण्यास श्री शिवाजी नावाचें नवीन वर्तमानपत्र निघूं लागलें आहे.

निझाम स्टेट रेलवे सुरू करण्याकरितां ग्रे. इं.पे. रेलवेची गाडी मुंबईहून ता० ७ रोजीं बारावर १ वाजतां निघून हैदराबादेस दुसरे दिवशीं संध्याकाळीं ४ वाजतां पोंचणार होती.

रजपुताना स्टेट रेलवे जयपुरापर्यंत सुरू होणार होती ती कांहीं कारणामुळें १२ व्या तारखेपर्यंत राहित झाली.

मुंबई इलाख्याचे कमांडर इन चीफ विलायतेस गेले.

मागील महिन्याचे १९ वे तारखेस सिलोन येथें धरणीकंपाचा धक्का बसला.

लंडनच्या तारेवरून समजतें कीं ता० १ अक्टोबर रोजीं रिजेंटकनालमध्यें एक दारूनें भरलेली होडी फुटून पुष्कळ मनुष्यें मेलीं व पुष्कळ घरांचीं नासाडी झाली.

रत्नागिरीस एकंदर १२० इंचपाऊस पडला.

नारविच आणि ब्रडाल या दोन स्टेशनामध्यें गाड्यांच्या टकारा होऊन मोठा अपघात झाला. दोन्ही मानसाच्या गाड्या होत्या या अपघातांत २० मनुष्यें मेलीं व ६० जखमी झालीं.

हिंदुस्थानांत प्रथम तंबाखू उपयोगांत आणण्याची चाल कशी प्रचारांत आली त्याबद्दलची चमत्कारिक हकीकत इलियट साहेबांनीं मुसलमान इतिहास कर्त्याविषयीं ग्रंथ केला आहे त्यांत लिहिलीं आहे ती

अशीः-- एका व्यापाऱ्यानें विजापुरास कांहीं तंबाखू आणला ती त्याणें एका सुंदर हुक्यांत भरून अकबर बादशहास दिला. बादशहानें हें काय आहे असें विचारल्यावरून त्याणें तें मक्का व मदीना एथील लोकांचें एक औषध आहे असें सांगितलें. हें बोलणें ऐकून बादशहाचे वैद्यानें बादशहास सांगितलें कीं, हा जिन्नस औषध असल्याबद्दल आपल्या वैद्यकीचे कोणतेही ग्रंथांत आढळत नाहीं त्या पेक्षां तो आपण सेवन करूं नये. हें ऐकून बादशहा बोलला कीं जी वस्तु दुसरे राष्ट्रांतील शहाणे लोक औषध ह्मणून उपयोगांत आणितात ती फक्त आपले वैद्यक ग्रंथांत नाहीं या कारणावरून औषध नव्हे असें ह्मणणें अगदीं अप्रशस्त आहे. पुढें तो व्यापारी पुष्कळ तंबाखूंचा भरणा आणूं लागला व बादशहाचे दरबारांतील सर्व अमीर उमराव वगैरे लोक त्याचा उपयोग करूं लागले. ने. ओ.

---

## अंतःकरणशुद्धि.

ईश्वराचा जो खरा भक्त आहे त्याचें अंतःकरण सुपरिशुद्ध होऊन त्याला क्रोध नाहीं, मात्सर्य नाहीं, लोभ नाहीं, तो कोणाचा द्रोह करीत नाहीं, सर्वांच्याठायीं त्याचें पूर्ण प्रेम असतें, क्षमा त्याच्या ह्रदयांत वास करते, त्याची अहंता नष्ट होते, त्याची वृत्ति अतिशय नम्र होते, असें आह्मी पूर्वीं सांगितलें आहे. ईश्वर भक्तीचीं हीं फळें होत. परंतु विचार केला असतां असेंही दिसून येईल कीं, ईश्वरभक्ती हें त्यांचें फळ होय. परमेश्वरभक्तीचा जो साधक आहे त्याणें हे गुण आपल्याठायीं अंशतः आणिले पाहिजेत. जो सर्वदा पापामध्यें रत असतो, पापांची ज्याला लाज वाटत नाहीं, कामक्रोधादिकांना जो वश असतो, दुसऱ्याचा द्रोह करितो, त्याच्या अंतःकरणामध्यें परमेश्वराचें रूप कधीं प्रगट व्हावयाचें नाहीं, त्याला परमेश्वराचें ध्यान व्हावयाचें नाहीं, त्याचे डोळेझांकणें व्यर्थ, त्याची प्रार्थना निरर्थक; त्या कृतीपासून त्याच्या अंतरात्म्यास सुख व्हावयाचें नाहीं, अमुक एकाकाळीं एखाद्या मनुष्याविषयीं अंतःकरणांत क्रोध उत्पन्न झाला आहे, "त्या लबाडानें मजसारिख्याची अप्रतिष्ठा केली त्याचें पारिपत्य केलें पाहिजे" असा विचार तेथें वागत आहे असें असून जर परमेश्वराची आराधना करावयास बसला तर कधीं त्यापासून त्याजला सुख व्हावयाचें नाहीं. ती आराधना व्यर्थ जाईल परमेश्वर त्याच्या ह्रदयांत उमटणार नाहीं. परंतु जर त्याचक्षणीं त्या मनुष्यास त्याणें क्षमा केली, त्याचें पारिपत्य करण्याचा विचार सोडून दिला, "तो माझा प्रिय बंधु आहे, माझी अप्रतिष्ठा केली? मी हा कींपदार्थ, माझा मोठेपणा तो काय; अनादि अनंत, परम महान जगदीश्वरापुढें माझी काय गणना," अशाप्रकारचे विचार अंतःकरणांत आणले तर परमेश्वराचें आनंदमय पवित्र स्वरूप तेथें प्रकट होऊन त्याचें ध्यान, त्याची आराधना सफळ होऊन आणि शांति व समाधान त्याच्या ह्रदयांत उत्पन्न होऊन नेत्रद्वारा प्रेमाश्रु निघतील. ह्मणून कामक्रोधादिक मनोवृत्तींचें आकलन करण्याविषयीं जो झटतो, आणि सर्वांच्याठायीं आपलें प्रेम वृद्धिंगत करतो त्यालाच ईश्वरभक्ती साध्य होते. ह्मटलें आहे.

नाविरतो दुश्चरितान्नाशान्ती नाममाहितः॥
नाशान्तमानसोवापि प्रज्ञानेनैन मांप्नुयात्॥

"दुराचरणापासून जो निवृत्त झाला नाहीं. ज्याच्या अंतःकरणांत शांति व समाधान वास करीत नाहींत. ज्याचें मन चंचल आहे. त्याला परमेश्वराचा अनुभव होणार नाहीं आणि त्याची प्राप्ति होणार नाहीं" हें खरें आहे. परम पवित्र, निष्कलंक अशा परमात्म्याचें स्वरूप पापी व मलिन अशा अंतःकरणांत कसें उमटेल? क्षुद्र विषयांमध्यें रत जी बुद्धि तिला, अनंत ज्याचें वैभव, अपरिमेय ज्याचें ऐश्वर्य, त्याचें आकलन कसें होईल? मनुष्यांचा जो द्वेष्टा, त्याच्या चित्तीं सर्वांचा सारख्या प्रकारें जो मायबाप त्याच्या स्वरूपाचा प्रकाश कसा पडेल? यास्तव अंतःकरणांतील मलाचें क्षालन करून तें सतत विमल ठेवण्याविषयीं जो निरंतर यत्न करितो, त्याच्या ह्रदयीं खऱ्या भक्तीचा उदय होतो, आणि ती हळु हळु उदय पावूं लागली ह्मणजे त्याच्या यत्नास जय मिळून चांगल्या पवित्र वासना, ज्या तो आपणास लावून घेत आहे, त्या दृढ होतात आणि पापापासून मुक्त होण्याच्या मार्गास तो मनुष्य लागतो. अंतःकरण शुद्ध हें ईश्वरभक्तीचें कारण, आणि ईश्वरभक्ति हें अंतःकरणशुद्धीचें कारण अशा प्रकारें ही दोन्ही परस्परांच्या वृद्धीस कारणें होतात. परंतु आरंभ अंतःकरणशुद्धीपासून झाला पाहिजे.

तर मग कामक्रोधादिकांचा निग्रह करून अंतःकरण स्वच्छ ठेवणें व त्यांत भूतदया वाळगणें हें आपलें मुख्य कर्तव्य आहे, परंतु मनुष्य खोट्या अभिमानानें इतका भरून गेला आहे कीं, आपले दोष त्यास दिसत नाहींत. दुसऱ्याचे सर्व दोष पूर्णपणें आपणास समजतात. बहुधा आहेत त्यांच्यापेक्षा जास्तही आपल्या दृष्टीस पडतात; पण आपल्या दोषांविषयीं आपण आंधळे असतों, दुसऱ्यांच्या दोषांचें उद्घाटन करून त्यायिषयीं चर्चा करणें हें काम आह्मास अतिशय प्रिय, पण आपल्या दोषांविषयीं आपण सदोदित मुके असतों; तर हें ठीक नव्हे. इहलोकीं व परलोकीं आपलें खरें हित जर करून घेणें आहे तर आपल्या दोषांकडे दृष्टी विशेष लाविली पाहिजे, कोणताही विचार मनांत आला आणि कोणतीही गोष्ट आह्मी करावयास लागलों ह्मणजे हा विचार, हें कृत्य योग्य आहे काय? ईश्वरास हें मान्य होईल काय? असें सतत आपणास पुसलें पाहिजे. आणि अयोग्य व ईश्वरास मान्य नाहीं असें आपल्या विवेकाच्या योगें आपणास समजलें ह्मणजे दृढ निश्चयानें तो विचार अंतःकरणांतून घालविला पाहिजे आणि त्या कृत्यापासून दूर राहिलें पाहिजे. असें केल्यानें कदाचित् आपलें ऐहिक नुकसान होईल परंतु त्याचेकडे लक्ष देतां नये. जों जों सत्याकरितां आपण नुकसान सोसतों, तों तों आपल्या अंतःकरणास यऱ्या गोष्टी करण्याचें अधिकाधिक बळ येईल. अशाप्रमाणें सतत आपणावर आपण पहारा ठेविला वाहिजे. आणि खऱ्या अंतःकरणानें आपले दोष घालविण्याचा आपण यत्न केला आणि तो सिद्धीस जात नाहीं, पुनः पुनः आपला पापसंकल्प आपल्या मनापुढें उभा राहतो, असें होऊं लागेल ह्मणजे त्याप्रसंगीं सर्व संकटांतून मुक्त करणारा जो दयाळू मायबाप त्यास अनन्यभावें शरण जावें ह्मणजे तो कृपानिधि आपणास मनाचें आकलन करण्याचें सामर्थ्य देईल आणि भक्ति व अंतःकरण शुद्धि ह्यांचा क्रम बरोबर चालवून आपणस भीतीपासून मुक्त करील. सु. प.

---

### हिंदुस्थानच्या प्राचीन आणि अर्वाचीन स्थितीची तुलना व त्यासंबंधें आपलें सांप्रत कर्तव्य.

(अकोल्याचे सभेपुढें वाचलेला निबंध.)

वाचकहो, हिंदुस्थानच्या प्राचीन अर्वाचीन स्थितीची तुलना ह्मणजे देशवासी लोकांच्या संबधानें झाली पाहिजे हें तर उघडच आहे तरी प्रथमतः ज्या देशांतील लोकांच्या स्थितीचें वर्णन करणार त्यादेशाचें संक्षिप्त वर्णन करणें फारच आवश्यक आहे असें मला वाटतें.

पहा आपला देश कसा आहे! ! विस्तीर्ण असून हवा पाणी उतम, फलपुष्पादि पदार्थ उत्तम प्रकारचे, नानाप्रकारचीं धान्यें, वनस्पती, मसाल्याचे पदार्थ, तेल काढण्याचीं बीजें, कस्तूरी सारखी परिमल द्रव्यें, शालजोड्या पीतांबर ह्यांसारखी वस्त्रें, हिरे, पाचमौक्तिक ह्यासारखे अलंकार ज्या देशामध्यें भरलेले आहेत, व ज्यांचें उत्पन्न आणखी किती वाढेल ह्याचा सुमार करितां येत नाहीं. इंग्लंड, फ्रान्स, इत्यादि देश ज्याचे एकेक प्रांत शोभणार, व ज्याच्या ऐश्वर्यास अनुलक्षून श्री महाभारतासारख्या ग्रंथांत, व्यासा सारख्या अप्रतिम विद्वानानीं महदनुभवा अंतीं "सुवर्ण पुष्पितां पृथ्वीं" असें ह्मटलें आहे, अशा प्रकारची ह्या हिंदुस्थानची देश संबंध स्थिति पाहून तुह्मी साश्चर्य झाला असाल ह्यांत संशय नाहीं.

ह्या देशाचे प्राचीन संस्कृत नांव आर्यावर्त असें अहे. परंतु तार्तर देशांतून जे मोगल मुसलमान लोक जिंकण्या करितां हिंदुस्थानांत शिरले होते त्यानीं आमच्या लोकांचे वर्ण काळे पाहून आह्मांस हिंदु असें नाव दिलें. यादेशांतलि लोक जितके विद्वान् होते तितके पूर्वी कोणत्याही देशांतलि लोक नव्हेत असें ह्मणण्यास कांहीं बाध नाहीं. कलाकौशल्याची पूर्णता ह्या देशासारखी कोठेंच नव्हती. गणित, ज्योतिष, तर्क, न्याय, व्याकरण, भूगर्भशास्त्र, इत्यादि गहन विषयामध्यें प्रति सूर्यासारखे तेजःपुंज व निष्णात पुरुष होऊन गेले. कालिदासा सारखे महा कवि ज्यांच्या रसिक कवनाचे मोल कुबेरदेखील करूं शकणार नाहीं असें कवि अनेक होऊन गेले. ज्याच्या काव्याचे संग्रह सर्व पृथ्वींतील लोक हाकांल मर्याद मोठ्या प्रेमानें व भक्तीनें करित आहेत. पाणीनी सारखे वैय्याकरणी कीं ज्यानीं आपल्या सूत्र नियमानीं भाषेचे गहन जालच केलें आहे व ज्याच्या पाशांत सापडलें असतां प्रस्तुत देखील महान महान पंडितांसही पार घेववत नाहीं असे दिव्य पुरुष देखील ह्याच आपल्या आर्यभूमिंतत निपजले होते. व्यासासारखे इतिहासकार देखील ह्याच आर्यावर्तिणीचे पुत्र. पिंगलासारखे छंदःशास्त्री देखील त्यांचे सहोदरच. भास्कराचार्यासारखे गणिती देखील भारत पुत्रच. अशाप्रकारानें ही आपली सकलैश्वर्यान्वितभूमिका प्राचीन काळीं ह्या कुवलयावर चंद्रिकाच होती असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. आतां ह्याच्या राजकीय इतिहासाकडेस वळूं प्रथमतः आर्यलोक हिंदुस्थानांत आले व इकडील सर्व प्रकारचीं सुखें अनुभवून परम संतोष पावले. सर्व गोष्टीचा ह्या देशांत सुकाळ पाहून मग त्यांस असें वाटूं लागलें कीं आतां आपणास दुसरें कर्तव्य कांहीं नाहीं. ऐष आराम भोगावा एवढेंच आपलें काम अशी जेव्हां त्यांची समजूत झाली. तेव्हां आळसानें त्यांवर स्वारी ठेवून त्यांस आपलेंसें केलें. मग रिकामपणाचे उद्योग, अग्नीवर तुपाची धार धरून हजारो मण तूप जाळावें, पल्लोगणती तीळ व तांदूळ नासावे, यासाटीं त्यांनीं नानाप्रकारचीं अनुष्ठानें व विधि रचिले. अशी यांची स्थिति पाहून उत्तरेकडील मोगल लोकांनीं येऊन ह्यांवर हल्ला केला. तेव्हां कोणी पांडवाचे वंशज, कोणी शालिवाहनाचे वंशज, कोणी राम लक्ष्मणाचे वंशज असे जो वडिलार्जित श्रेष्ठतेचाच केवळ अभिमान बाळगणारे सुस्त राजे होते त्यांस जंगली पठाणांनीं व क्रूर मोगलांनीं तुडवून जमीनदोस्त केलें, त्यांच्या स्त्रिया आपल्या जनानखान्यांत घेतल्या, मुलां लेकरांस गुलाम करून विकिलें उत्तमोत्तम मंदिरांचा विध्वंस केला. काशी विश्वेश्वर, स्थानेश्वर, सोमेश्वर, सोरटी सोमनाथ इत्यादि देवस्थानें भ्रष्ट केलीं व शिपायांकडून लुटविलीं. अहाहा ! तो गहजब काय सांगावा ? ज्या पाषाण मूर्तींवर तिळातांदुळाच्या शेकडों वर्षें लाखोल्या पडत आल्या त्यांचे त्या शिखानष्टांनीं पाटे वरवंटे केले. ह्याप्रमाणें या हिंदुस्थानांत मुसलमान लोक येऊन त्यांनीं मूळची कांहीं पदवी किंवा थोरवी नसतां केवळ तरवार चालवून राज्य मिळविलें. पुढें ज्याप्रमाणें अकस्मात् मोठी वावटळ सुटून पृथ्वीचे रजःकण आकाशांत व आकाशांतले पृथ्वीवर येऊन एकच गर्दी उसळून जाते तसा यावेळीं आमचे हिंदुस्थानचा न्याय झाला. परकी मुसलमान राजे आह्मावर आले; व आमचे स्वदेशीय राजे दिगंतरास गेले व कोणी राहिले ते त्या नीचांच्या पायदळीं उभे राहिले, त्यांवर चवऱ्या धरूं लागले व त्यांचे जोडे पुजूं लागले. असा बराच काळ गेल्यावर मुसलमान लोकही शांत झाले. व त्यांस संपत्तीचा मद चढला. तेव्हां गर्वाचें घर खालीं ही ह्मण खरी व्हावयाचीच. त्या धोरणानें ते आपसांत एकमेकांचे शत्रू होऊन स्वतांच आपले नाशास कारण झाले.

पुढें चालू.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचें वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

0 7,1874
REDIRECTED
UNPAID SORTING
BOOLDANAH

# व[…]माचार.

[…]समाचार ता० १८ मा[…]
[…]त. मुंबईच्या टाइम्स क[…] | या शह[…]
[…]हिंदुस्थान सरकारास फार[…] | येथील[…]

पुस्तक ८ अकोला [illegible] माहे अक्टोबर सन १८७४ इ० अंक ४२

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| [illegible] | रु. |
| [illegible] आगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

### गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाच्या औषधाच्या डब्या विकावयाच्या आहेत. हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो, लावतांनां आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटीप्रमाणें पातळ करून स्नान केल्या नंतर लावावें. किंमत ६ आणे.

हें औषध गजकरणाशिवाय खरूज व नायटे यांजवरही चांगले प्रकारें लागू होतें.

शिवलीलामृत अध्याय ११ व व्यंकटेशस्तोत्र.

असें एकत्र पुस्तक कोणी भाविक गृहस्थानीं आमचे छापखान्यांत टाइपावर छापविलें त्याच्या थोड्या प्रती विकावयाच्या आहेत. किंमत ४ आणे डाक हाशील ०१

### सन १८७५ इसवी सालाकरितां रोजनिसी.

ह्या नांवाची स्मरणवही उत्तम डेमी कागदावर १६ पेजी सांच्याची ह्मणजे पाकेट डिक्शनरी सारखी छापून ता० २५ नोव्हेंबरचे सुमारास तयार होईल हींत सरसालचे दिनचर्येसंबंधीं माहिती असोन शिवाय रेलवे, स्टांप, तारायंत्र, मनीआर्डर पोस्ट इत्यादि अनेक, नेहमीं जरूर लागणारे उपयुक्त विषयांची कार्या कारण माहिती दिली जाईल हिची किंमत आक्टोबर अखेर पर्यंत आगाऊ आह्माकडे भरणारांस दर प्रतीस ०५ आणे पडतील. दहा प्रती घेणारांस डांक हांशील पडणार नाहीं किरकोळ घेणारांस डांक हाशीला बद्दल खेरीज दर प्रतीस एक आण्याप्रमाणें जास्त किंमत पाठवावी लागेल.

भाऊ गोविंदसापकर.
ज्ञानचक्षूचे मालक.

## जाहिरात.

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY.
OPENING OF THE NIZAM'S STATE RAILWAY.

ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

### निजाम स्टेट रेलवेची सुरवात.

या लेखाच्या द्वारानें अशी जाहिरखबर देण्यांत येते कीं, तारीख ९ वी आक्टोबर सन १८७४ इसवी रोजीं व त्या दिवसानंतर निजाम स्टेट रेलवे रस्ता सर्व प्रकारच्या व्यापाराकरितां वाडी येथील जंकशनावर या रेलवेशीं लगून तेथून स्टेट लाइनची हैदराबाद, आणि सिकंदराबाद आणि दरम्यानचीं सर्व स्टेशनें यांवर सुरू होईल.

स्टेट लाइनवरील काम सध्या आणि पुढें जाहिरखबर येई तोंपर्यंत, या कंपनीकडूनच करण्यांत येईल. आणि उतारू, त्यांच्या बरोबरचे जावयाचें सामान, घोडे गाड्या, कुतरे व दुसरे प्राणी, पार्सलें आणि सर्व प्रकारचा माल नेण्या आणण्याविषयीं या रेलवे कंपनीचे जे नियम व ज्या शर्ती त्या त्या वेळेस अमलांत असतील त्याप्रमाणें आणि या कंपनीचे जे दरदाम अमलांत असतील त्याप्रमाणेंच नेला आणला जाईल-

हरएक प्रकारच्या व्यापाराची नोंदणी, वाडी मार्गानें निजाम स्टेट रेलवेचीं स्टेशनें आणि या कंपनीचीं स्टेशनें व दुसऱ्या ज्या कंपन्याशीं तहत नोंदणी करण्याबद्दल व्यवस्था केलेली आहे त्यांची स्टेशनें यांच्या दरम्यान पाहिजे तर तहत केली जाईल.

स्टेशनें, ट्रेनच्या वेळा वगैरेबद्दल माहिती पाहिजे असेल तर आजच्या तारखेचें स्टेट रेलवेचें टाइमाबिल स्टेशनावरून लावलेलें आहे तें पहावें. दरदाम वगैरेबद्दल आणि दुसऱ्या विशेष गोष्टींबद्दल माहिती स्टेशनावरून मिळेल अथवा खालीं सही करणाराकडे अर्ज केला असतां मिळेल.

हेनरी कांडर,
जनरल ट्राफिक मानेजर.

मुंबई, ता. ३ री
आक्टोबर सन १८७४ इसवी.

## नोटिसा.

नोटिस— हरदयाल गोविंदराम दुकान बाळापूर यांस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येतें कीं तुह्मी तारीख २७ माहे सप्तंबर सन १८७४ इसवीचे वऱ्हाडसमाचारांत कवतुकी बाईचे व आमचे नावानें नोटिस दिली त्या नोटिशीवरूनच होत आहे कीं तुमचें घेणें नारायणराव याजकडेस आहे. नारायणरावची वारस कातुकी बाई आहे तूर्त आह्मी नारायणरावचे कायदेशीर वारस नाहीं व त्याची जिंदगी आह्मी घेतली नाहीं व तो व आह्मी विभक्त ३० वर्षांपासून आहो यामुळें त्याचे कर्जाचा आमच्याशीं कांहीं संबंध नाहीं आणि आह्मी तुमचे देणेदार नाहीं असें असून तुह्मी विनाकारण आमचे नावची नोटिस देऊन आमचे अब्रूस कमीपणा आणण्याची तजवीज केली आहे यास्तव या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं आजपासून १५ दिवसांचे आंत विनाकारण नोटिस देऊन अब्रूस कमीपणा आणल्याबद्दल माफी मागावी व या नोटिशीबद्दल खर्च आणून द्यावा असें न कराल तर तुह्मावर कायद्याप्रमाणें अब्रू घेतल्याबद्दल फौजदारींत फिर्याद केली जाईल कळावें तारीख १३ माहे अक्टोबर सन १८७४ इसवी

( सही ) गणपतराव देवराव मुकदम
देशमुख दस्तुर खुद्द

नोटिस— महंमद गवसु वल्द महंमद जमा मुसलमान सदर मक्तेदार रहाणार कसबे अकोट यांस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं तुह्मापासून मौजे आसेगाव व मौजे जऊळक प्रगणें अकोट येथील साल मजकुरचा अफु गांजाचा पोटमक्ता ११७५ रुपयांस घेतला असून कबुलायत लिहून दिल्याप्रमाणें दरमहाचे दरमहा रुपये नेमले तारखेस देत आहों. परंतु हलीं तुमचें ह्मणणें आहे कीं दिलेले पोटमक्त्यांत ज्यास्ती फायदा आहे. सबब मजला आणखी २०० रुपये ज्यास्ती द्यावे नाहीं तर मी कोणतेही प्रकारें दोष लाऊन पोटमक्ता जप्त करीन पण ही गोष्ट आतां तुह्मास करणें वाजवी नाहीं व तुमचेकडून आतां आमचे कांहीं होणें नाहीं असें तुह्मास कळविल्यामुळें तुह्मी विनाकारण आमच्याशीं द्वेष वाढवून आमचें नुकसान करावें असा यत्न चालविला आहे. तो असा:—

माहे सप्तंबर सन मजकुरचे माहेवारीचे ९७ रुपयें तारीख २४ मिनहू रोजीं मी तुह्माकडेस पाठविले असतां उदईक घेऊ ह्मणून सांगितलें ते तारीख २५ रोजीं घेऊन आलो तर तुह्मी घरीं नाहीं ह्मणून तुमचे घरांतील माणसानीं कळविलें. नंतर दुसरे दिवशीं तुमची भेट झाल्यावर तुह्मास विच्यारिलें असतां रुपये उदईक कचेरींत घेऊन यावे ह्मणून सांगितलें त्याप्रमाणें तारीख २७ रोजीं रुपये कचेरींत घेऊन आलो तर तेथेंही तुह्मी भेटला नाहीं अखेरीस कचेरींतील लोकांस हा मजकूर मी कळवून घरीं आलो आणि रुपये जानजी वल्द हावजी जवंजाळ याजपाशीं ठेऊन दिले. याप्रमाणें तुह्मी बुध्या टाळाटाळ करून नेमले तारखेस रुपये दिले नाहींत असा दोष मजवर देऊन पोटमक्ता जप्त करण्याकरितां आसेगाव मुक्कामीं येऊन दोन तीन दिवस आमच्याशी धामधूम करून बळेंच आमची दुकान तेथें कायम असतां तुह्मी गैर कायद्यानें स्वस्ती महाग अफू विकणें सुरू केली, व पुढें तुमचे तुह्मासच बरोबर न वाटल्यावरून तारीख १ अक्टोबर सन १८७४ इसवी रोजीं तुह्मी आपली दुकान उठवून घेतली. त्या तीन चार दिवसांत माझी बरीच नुकसानी झाली त्याविषयीं आह्मास जी तजवीज पुढें पहाणें आहे ती पाहू परंतु तुमचे महावारीचे रुपये जे आह्मी ठेविले आहेत ते दिले नाहीं ह्मणोन तुह्मी आह्मास खोटेपणानें बदलाम करिता यस्तव तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुमचे रुपये आजपावेतों तसेच अमानत आहेत ते तुह्मी नोटिस पावतांच घेऊन जावे अगर रुपये न न्याल तर पुढें त्याचे व्याजाबद्दल वगैरे कोणतेच प्रकारें आमचेवर तुमचा दावा चालणार नाहीं व तुमची मर्जी असेल तर पुढील महावारीचे रकमेचें व्याज कापून देत असल्यास तेही रुपये आज आह्मी देण्यास तयार आहों मात्र तुह्मी जी नुकसानी केली आहे ती व या नोटिशीचा खर्च असा तुह्मांस द्यावा लागेल हें पक्केपणें समजावें. कळावें तारिख ९ माहे अक्टोबर सन १८७४ इसवी.

(सही) अबदुलगनी वल्द खान महमद मुसलमान राहणार आकोट निशाणी खुद्द हातची कटार.

वऱ्हाडसमाचार

मिती आश्वीन शुध्द ८ शके १७९६

### हिंदुस्थानांतील न्यायखात्याचा खर्च.

सरकारास हिंदुस्थानांत प्रत्येक इलाख्यांत न्यायाचीं कोर्टें ठेवण्याबद्दल किती खर्च लागतो व त्यापासून किती फायदा होतो त्याचा तपशील.

अयोध्या.

जमा.

| | |
|---|---|
| कोर्टफीच्या स्टांपाचें उत्पन्न रु. | ६९५००० |
| ला आणि जस्टिसचें उत्पन्न. रु. | ११०००० |
| एकंदर रु. | ८०५००० |

खर्च.

| | |
|---|---|
| जुडिशियल कमिशनर. रु. | ६५००० |
| सिविल व शेशन कोर्टें. | ८१९०० |
| स्मालकाज कोर्टें. | १३५०० |
| फौजदारी कोर्टें. | ५१२६०० |
| एकंदर. रु. | ६७३००० |

**नागपुर इलाखा.**

जमा.

| | |
|---|---|
| कोर्टफीच्या स्टांपाचें उत्पन्न. रु. | ६५५००० |
| ला आणी जस्टिसचें. उत्पन्न रु. | १३९००० |
| एकंदर रु. | ७९४००० |

खर्च

| | |
|---|---|
| जुडिशियल कमिशनर. रु. | ५८१२० |
| स्मालकाज कोर्टें | ३५४४० |
| फौजदारी कोर्टें | ६०६४४० |
| एकंदर रु. | ७००००० |

**ब्रह्मदेश.**

जमा.

| | |
|---|---|
| कोर्टफीच्या स्टांपाचें उत्पन्न. रु. | ३३०००० |
| ला आणि जस्टिसचें उत्पन्न | २१८००० |
| एकंदर रु. | ५४८००० |

खर्च.

| | |
|---|---|
| रेकार्डरचें कोर्ट. रु. | ४५६६० |
| ला आफिसर | १८६०० |
| जुडिशियल कमिशनर | ४७८९० |
| सिविल व शेशन कोर्टें | ९७६०० |
| स्मालकाज कोर्टें | २५८५० |
| फौजदारी कोर्टें. | ५७४४०० |
| एकंदर रु. | ७४०००० |

**बंगाल इलाखा.**

जमा.

| | |
|---|---|
| कोर्टफीचे स्टांपाचें उत्पन्न रु. | ५९३७८०० |
| ला आणि जस्टिसचें उत्पन्न. रु. | ९६०००० |
| एकंदर रु. | ६८९७८०० |

खर्च.

| | |
|---|---|
| हायकोर्टाचे जज्ज. रु. | ५८५००० |
| हायकोर्टांतील अपिलेट. व ओरिजनल शाखा. | ४९२००० |
| ला आफिसर | १४६००० |
| कॉरोनरचें कोर्ट. | ११९०० |
| जस्टिसेस आफ धि पीस. | ५८८०० |
| सिविल व सेशन कोर्टें. | ३१७७००० |
| स्मालकाज कोर्टें. | २९२८०० |
| फौजदारी कोर्टें. | २०७४५०० |
| ए. रु. | ६८३८००० |

**वायव्य प्रा.त.**

जमा.

| | |
|---|---|
| कोर्टफीच्या स्टांपाचें उत्पन्न रु. | २८७२००० |
| ला आणी जस्टिसचें उत्पन्न. रु. | ४३०००० |
| एकंदर रु. | ३३०२००० |

खर्च.

| | |
|---|---|
| हायकोर्टाचे जज्ज | १९१४०० |
| त्यांचें एस्टाब्लिशमेंट | १११३४० |
| ला आफिसर | १८१०० |
| सिविल व सेशन कोर्टें. | १८५९२७० |
| स्मालकाज कोर्टें | ४६९१० |
| फौजदारी कोर्टें. | ११०३९८० |
| एकंदर रु. | ३०३१००० |

**पंजाब.**

जमा.

| | |
|---|---|
| कोर्टफीच्या स्टांपांचें उत्पन्न रु. | १६९२८०० |
| ला आणि जस्टिसचें उत्पन्न रु. | ४३५००० |
| एकंदर रु. | २१२७८०० |

खर्च.

| | |
|---|---|
| हायकोर्टाचे जज्ज व त्यांचे एस्टाब्लिशमेंट. | २०३९०० |
| लॉ आफिसर | १३३२० |
| सिविल व सेशन कोर्टें | ३१५००० |
| स्मालकाज कोर्टें. | १०५०८० |
| फौजदारी कोर्टें, | ११८२७०० |
| | १८२०००० |

**मद्रास**

जमा.

| | |
|---|---|
| कोर्टफीच्या स्टांपाचें उत्पन्न. रु. | २९३५००० |
| ला आणि जस्टिसचें उत्पन्न. रु. | ४४०००० |
| एकंदर रु. | ३३७५००० |

खर्च

| | |
|---|---|
| हायकोर्टाचे जज्ज. रु. | २३४६०० |
| हायकोर्टांतील अपिलेट व ओरिजिनल शाखा | १९२२५० |
| लॉ आफिसर | ६४०५० |
| अडमिनिस्ट्रेटर जनरल. | ७२०० |
| कारोनरचें कोर्ट. | ७७४० |
| जास्टिसेस आफ धि पीस. | ६६५०० |
| सिविल व सेशन कोर्टें | १९३५९६० |
| स्मालकाज कोर्टें. | २५५०५० |
| फौजदारी कोर्टें. | ९४२६५० |
| एकंदर रु. | ३७ ६००० |

**मुंबई**

जमा.

| | |
|---|---|
| कोर्टफीच्या स्टांपाचें उत्पन्न. रु. | ३ १०००० |
| ला आणि जस्टिसचें उत्पन्न | ३५००००० |
| एकंदर रु. | ३३६००००० |

खर्च

| | |
|---|---|
| हायकोर्टाचे जज्ज रु. | ३६८००० |
| हायकोर्टांतील अपिलेट व ओरिजनल शाखा. | ३०९००० |
| लॉ आफिसर | १००००० |
| अडमिनिस्ट्रेटर जनरल | ७८०० |
| कारोनरचें कोर्ट | १५७०० |
| जस्टिसेस आफ धि पीस वगैरे | ८५००० |
| सिविल व सेशन कोर्टें | १५६३००० |
| स्मालकाज कोर्टें. | २६०००० |
| फौजदारी कोर्टें. | १२७८५०० |
| एकंदर रु. | ३९८७००० |

एकूण एकंदर जमा रु. २११०९६००

एकंदर खर्च २१४९५०००

सदरहू वरून पाहिलें असतां सरकारास न्यायाचां कोर्टें ठेवण्यास जो खर्च लागतो तो बहुतेक त्यांचे उत्पन्नानेंच भागतो. ब्रह्मदेश, मद्रास आणि मुंबईखेरीज करून सर्व इलाख्यांतील न्यायाचे कोर्टांचा

...तशिलक ईल. अशाप्रमाणे सतत आपणावरनें सहज लक्ष्यात [illegible] ारचे कर देत असतां न्यायाबद्दल प्रजेवर इतका जबरदस्त कर पडावा हें बरोबर नहीं तर सरकारानें इकडे लक्ष देऊन होईल तितका कराचा बोजा कमी करावा म्हणजे हिंदुस्थानांतील गांजलेली प्रजा दुवा देईल.

## निजाम सरकारची रेलवे.

आमचे बहुतेक वाचकांस ठाऊक असेल कीं निजाम सरकारानें आपले खर्चानें रेलवे करण्याचें काम सन १८७१ च्या फेब्रुवारी महिन्यांत सुरू केलें होतें तें चार महिन्यापूर्वीं पुरें झालें. पुढें त्यावरून आगगाडी चालू करण्याचा प्रथम समारंभ पर्जन्य काळामुळें तकूब ठेविला होता तो या महिन्याचे ८ वे तारखेस केला. समारंभाची तयारी दिवाण साहेब सर सालरजंग यांनीं फार उत्तम केली होती. हिंदुस्थानचे गवरनर जनरल साहेब व इलाख्याचें गवरनर साहेब व दुसरे मोठमोठाले सरकारी अधिकारी यांस समारंभास बोलाविलें होतें पण गवरनर किंवा गवरनर जनरल अथवा दुसरे तसे मोठाले कामदार यांचें जाणें झालें नाहीं. मुंबईहून रेलवे कडील मि० कांडर साहेब ट्राफिक म्यानेजर व दुसरे ८।१० गृहस्थ या समारंभास गेले होते. व आमच्या वऱ्हाडांतून बहुतेक डिपुटी कमिशनर, कमिशनर, व इतर युरोपियन कामदार मिळून सुमार २० गृहस्थ गेले होते. या समारंभाकारितां जाणाऱ्या लोकांसाठीं स्पेशियल ट्रेन मुंबईहून ७ वे तारखेस दुपारीं साडेबारा वाजतां निघाली ती सायंकाळीं पुण्यास पोचली. व वऱ्हाडांतील मंडळी ६ वे तारखेस इकडून निघून ७ वीला पुण्यास गेली होती. तेथें रायल हाटेलांत या सर्व लोकांच्या भेटी झाल्या व रेलवे कंपनीच्या खर्चानें तेथें त्यांना मेजवानी झाली नंतर रात्रीं साडे सात वाजतां ही सर्व मंडळी त्या स्पेशियल ट्रेनमध्यें बसून सकाळीं ७ वाजतां सोलापुरापलीकडे मुंबईहून १० मैलावर शाहाबादेच्या स्टेशनावर आली. तेथें दोन तास मुक्काम झाला. व दिवाण साहेबांनीं फराळाचा बेत करविला होता तेथें यथेच्छ फराळ झाले नंतर तेथून पुन्हा स्पेशियल ट्रेन निघाली ती साडेच्यार वाजतां सिकंदराबादेस पोचली. तों त्याच सुमारास तेथें एक स्पेशियल ट्रेन तयार होती व तिजमध्यें दिवाण साहेब रेसिडेंट साहेब व दुसरे बहुतेक अधिकारी व सरदार लोक बसलेले होते ती व ही मुंबईहून आलेली ट्रेन एक केली व तींतून दोन कोसावर हैद्राबादचें स्टेशन चदर घाटी आहे तेथें सर्वजण त्या गाडींत बसून गेले. व स्टेट रेलवेच्या सुरवातीचा त्यांनीं उत्साह केला. नंतर दुसरे दिवशीं म्हणजे ९ वे तारखेपासून सर्व लोकांकारितां हैद्राबादेहून आगगाडी जाण्या येण्याची सुरुवात झाली.

दुसरे दिवशीं निजाम साहेबाकडे दरबार झाला त्या प्रसंगीं रेसिडेंट साहेबांनीं गवरनर जनरल साहेबाकडून आनंदप्रदर्शित पत्र आलेलें वाचून दाखविलें व कामाची हरकत नसती तर ते मेळ्या संतोषानें या समारंभास आले असते असें सांगितलें. निजाम साहेबाचें वय ९ वर्षांचें आहे. तरी रेसिडेंट साहेबाचे इच्छेवरून त्यांनीं लार्ड नार्थब्रूक यांचें, व मि. सांडर्स यांचें अशीं दोन्ही नांवे त्यांच्या हुद्या सहित हिंदुस्थानी लिपींत सुवाच्य काढून दाखविलीं तीं पाहून सर्वांस फार संतोष झाला. नंतर रात्रीं व दुसरे तिसरे दिवशीं मेजवान्या झाल्या दारूकाम झालें व शहरांतून हत्तीवर बसवून वगैरे साहेबलोकांची मिरवणूक झाली. याप्रमाणें रेलवेच्या सुरवातीचा समारंभ झाला व तो पहाण्यास लाखो लोक जमले होते.

ही निजाम सरकारची स्टेट रेलवे शाहाबादेपासून हैदराबादेपर्यंत १२८ मैल आहे. व शाहाबादेपासून ७ मैलावर निजाम सरकारचें पहिलें स्टेशन वाडी या नावाचें आहे. मध्येंतरीं १५ मैल लहानसा घाट आहे. शाहाबादेहून सकाळीं साडेआठ वाजतां गाडी निघते ती संध्याकाळचे ६ वाजतां हैदराबादेस जाते व हैदराबादेहून सकाळीं साडेसहा वाजतां गाडी निघते ती दुपारीं तीन वाजतां शाहाबादेस जाते. निजाम सरकारच्या रेलवेचें टाइमटेबल मद्रास आणि मुंबई या दोहों बाजूंच्या गाड्यांच्या धोरणावर ठेवतां येईना म्हणून फक्त मुंबईच्या जाण्या येण्याच्या गाडीच्या धोरणावर स्टेटरेलवेचें टाइमटेबल ठेविलें आहे. निजाम सरकारच्या ज्या प्रांतांतून ही रेलवे गेली आहे ते प्रांत फारसे लागवडीचे आहेत असें दिसत नाहीं. त्यांत जागोजाग वैराण व जंगल फार आहे यामुळें रेलवेला फायदा कसा काय होईल तें तूर्त कळत नाहीं व त्याकरितांच जी. आय. पी. रेलवेनें या रेलवेचें कांट्राक्ट न घेतां कच्च्या खर्चानें काम चालविण्याचें कबूल केलें आहे त्यामुळें नफा राहिल्यास निजाम सरकारास मिळेल, नाहींपेक्षां तोटा झाल्यास जी. आय. पी. आरची भरती करावी लागेल. हैद्राबादची वस्ती सुमार ४ लक्ष आहे व तेथून सिकंदराबादेस दररोज सुमार ९०० मनुष्यें जातात व तितकींच तिकडून हैदराबादेस येत असतात असा अंदाजा आहे त्यावरून या दोन स्टेशनाचे दरम्यान एकाहून अधिक वेळां गाड्या जातयेत जातील असें दिसतें. मुंबईहून हैदराबादेस जाण्यास २६ तास लागतात.

निजाम सरकारचे मनांत रेलवे करण्याची कल्पना सन १८६० सालीं आली होती व त्यावेळीं रस्त्याची सरव्हेही झाली होती पण पुढें तें काम तसेंच राहिलें. त्यावेळीं मुंबईकडील रेलवे सोलापुरासही येऊन पोचली नव्हती. नंतर सुमार ८।१ वर्षांनीं हा स्टेट रेलवेचा बेत होऊन सन १८७१ चे फेब्रुवारी महिन्यांत कामाची सुरवात झाली. १२६३८१३८ रुपयांचें सांगशन होतें त्याहून किंचित् अधिक खर्च झाला पण काम फारच उत्तम झालें आहे. स्टेशनें, वेटिंग रूम्स, प्लाट फार्म्स, फेनासिंग, मैलाचे खांब व इतर सामान मोठें झोकदार आहे. एक दोन

स्टेशनाला पोर्टर लोकांसाठीं जीं घरें केलीं आहेत तीं तशीं मुंबईस कापावर असतीं तर महिना ३०० रुपये एकेकाचें भाडें आलें असतें असें ग्याझेटच्या बातमीदारानें लिहिलें आहे. यांत अतिशयोक्ति दिसते, तरी, या रेलवेवरील कामें चांगलीं आहेत यांत संशय नाहीं. लंडन शहराला किंवा पारिसलाजाण्यालाजशा प्रकारची रेलवे असावी तशा प्रकारची उत्तम ही रेलवे आहे असें ह्मणतात या चांगुलपणाबद्दल आह्मांस फार संतोष वाटतो. व आमच्या निजाम सरकाराला या रेलवेपासून उत्तरोत्तर फायदा होवो व ह्या योगानें ठिक ठिकाणीं आणखी रेलवे करण्याचें त्यांस व त्यांचे पाहून इतर राजेरजवाड्यांस उत्तेजन येवो असें आह्मी मनापासून इच्छितो.

वऱ्हाडचा व हैदराबादचा निकट संबंध आहे त्यामुळें वादी, प्रतिवादी, वकील, कामदार यांस बहुत प्रसंगीं हैदराबादेस जावें लागतें तें आतां थेट रेलवे चालू झाल्यानें फार सुलभ होईल. इकडून सरळ रेघेनें पाहिलें तर हैदराबाद १२९ कोस आहे व रेलवेच्या वाटेनें सुमार ४२९ कोस आहे. पायवाटेनें गेले तर १० दिवस लागतात. व रेलवेनें गेलें तर आज सायंकाळीं गाडींत बसावें तों उद्यां सायंकाळीं पुण्यास जावें व परवा सायंकाळीं हैदराबादेस उतरावें इतकी सुलभता झाली आहे. स्टेट रेलवे चालू नव्हती तेव्हां लोक कलबुर्ग्यांपर्यंत आगगाडीनें जात व पुढें कटकटाच्या बैल गाड्यांतून जात व त्यापासून मोठा त्रास असे तो आतां समूळ टळल्या येणेंकरून वऱ्हाडांतल्याही बहुत लोकांस संतोष होईल यांत संशय नाहीं.

## वऱ्हाड.

हैदराबादच्या रेलवेच्या समारंभाकरितां इकडून मंडळी गेली त्यांत मेजर बेल साहेब येथील जुडिशियल कमिशनरही गेलेले होते. व एके रात्रीं मंडळींत उभे असतां त्यांतील काहीं बाण फुटले व त्यांचा एक तुकडा बेल साहेबाचे उजवे मनगटास व बरगडींत लागला तेणेंकरून त्यांस बरीच जखम झाली आहे व ते आजारी आहेत असें तारायंत्रांतून वाईट वर्तमान आलें आहे; तथापि ती जखम भयंकर नाहीं असें समजतें ही गोष्ट चांगली आहे.

कर्नेल नैभार्ड साहेब रिविन्यु कमिशनर हैदराबादच्या समारंभास मंगळवारच्या स्पेशियल गार्डींतून न जातां दुसरे दिवशीं स्वतंत्रपणें आपले पत्नीसहवर्तमान गेले आहेत असें समजतें.

हिंदुस्थान सरकारानें आपला असा निश्चय प्रसिद्ध केला आहे कीं वऱ्हाड परत देण्या घेण्याच्या बाबदींत वाटाघाट चालविण्याची आह्मी अगदी मना केली आहे व यापुढें निजाम सरकारच्या दिवाणाकडून या बाबदींत पत्रें आल्यास तीं घेतलीं जाणार नाहींत. मुंबईच्या टाइम्स कर्त्यानें या विषयीं हिंदुस्थान सरकारास फार निषेधिलें आहे.

पोलिसाकडील करीमखान व शिवराम सिंग यांचे हैदराबादेस अपील झालें. आतां चौकशीची तारीख कळेल तेव्हां मुंबईहून मि. ब्रान्सन साहेब ते अपील चालविण्यास जातील.

हैदराबादेस गेलेले कांहीं साहेबलोक२४वे तारखेपर्यंत परत येत नाहींत असें कळतें.

अकोल्याच्या म्युनिसिपालिटींतील मेंबर मि० गंगाधर जोरावरमल व मिल अवास बेग यांस मुदत भरल्याच्या संबंधानें कमी केलें व मि. खंडेराव बाळाजी फडके आणि मि. जोरावरखान यांच्या मुदती भरल्या असतां त्यांस पुन्हा मेंबर कायम केलें; व मि० भास्कर सखाराम क्लार्क आफ धि कोर्ट व मि० कादरभाई बोहारी यांस नवीन मेंबर केलें.

भाद्रपद वद्य ३० स आलेलें सूर्यग्रहण आपल्या जुन्या पंचांगाप्रमाणें बिलकुल लागलें सुटलें नाहीं. व तें केरोपंताच्या पंचांगाप्रमाणें तंतोतंत खरें झालें याजबद्दल आतां तरी लोकांनां छत्रेयांच्या पंचांगावर विश्वास ठेवावा अशी आह्मी सर्वांस शिफारस करितो. कैलासवासी आबा साहेब पटवर्धन यांनीं केरोपंताच्या पंचांगास अनुसरून काहीं धर्म कर्म केलें होतें तर पुण्याच्या लोकांनीं आबा साहेबास बहिष्कृत केलें होतें व पुढें मंडळींत येण्यासाठीं त्यांस प्रायश्चित्त घ्यावें लागलें. आणि आतां तें पंचांग खरें ठरलें आहे तर तद्विरुद्ध वागणारे दोषी नव्हेत काय? असतु. लोकांनीं उमजून अजून तरी खऱ्याची सोंथ करावी. अंध परंपरा चालऊ नये.

अकोल्यास हायस्कुलाच्या संबंधानें बोर्डिंग ह्मणजे भोजनगृह स्थापन झालें आहे त्याची व्यवस्था फार उमत्त आहे. प्रत्येक मुलास उष्णोदकाचें स्नान, उत्तम प्रतीचें सात्विक भोजन, व अभ्यासास दिवा मिळतो. रहावयास उत्तम जागा, शिवाय धोत्रें गडी धुतो आणि या इतक्या सर्वांबद्दल मुलास फक्त ४ रुपये महिन्यास द्यावे लागतात हे सोयीच्या मानानें पाहिलें असतां फारच थोडे आहेत. ह्मणून मुलांनीं या बोर्डिंगाच्या उत्पादकाचे आभार मानिले पाहिजेत. हायस्कुलांतील एक असिस्टंट मास्तर हे आठ आठ दिवस तेथें राहून मुलांवर देखरेख ठेवितात ही व्यवस्था पसंत आहे.

### बातमीचें पत्र

देऊळगाव— जाधवराजानीं देऊळगावीं स्थापन केलेली श्री व्यंकटेशाची जत्रा दसऱ्यास भरत असते. गुदस्त सालापेक्षां सुभत्ता चांगली असल्यामुळें यंदा जत्रा बरीच भरेल असें वाटतें. या गावांत शेती अगदी थोडी किंबहुना नाहीं ह्मटलें तरी चालेल. सरकारी अगर सावकारी नोकरी किंवा व्यापार हींच शहरोशहरीं लोकांची मुख्यत्वेंकरून साधनें होत. परंतु या शहरचे लोकांचा चारितार्थ हा जत्रा व येथील देवस्थान यांवर आहे. सरासरी मानानें पाहूं गेलें असतां वार्षिक कानगीचें उत्पन्न एक लक्षाहून जास्त असतें जत्रा गावांत भरते तेव्हां ग्रामस्थ लोकांस फक्त भाड्याचेंच उत्पन्न सुमारें २० हजारांहून कमी होत नसे असें सांगतात. जत्रेची जागा सरकारानें गावाबाहेर नेमून बंदोबस्तही उत्तम ठेवित गेल्यामुळें यात्रेकरांत व व्यापारी लोकांस गावांत येण्याचें जरूरी नाहीं यामुळें गावांतील बहुतेक कुटुंबाची ९ । १ महिन्यांची पोटगी बुडून गेली आहे. देवस्थानचे माजी वहिवाटदार प्रसिद्ध हरि सावजी यांचे कारकिर्दींत ब्राह्मण, अतित, अभ्यागत वगैरे लोकांस बहुत मिळकत होई. ह्मणून त्यांची लोक फारच प्रशंसा करितात.

हल्लींचे वहिवाटदार गोपाळराव यांनीं उत्साहाचें काम फार हुशारीनें चालविलें आहे व यात्रेसंबंधी सर्व मंडपाचें सामान व धान्य वगैरे किफायतवार घेतलें आहे. हे बहुतकरून यश मिळवितील असें वाटतें पुढें काय होईल पहावें.

दीपवाळीचे सणाकरितां सर्वत्र घरें सारवुन सूरऊन स्वच्छ करितात परंतु ही दुरस्ती येथील लोक या उत्साहाकरितां करीत असतात. जिल्ह्याचे अधिकारी बंदोबस्ताकरितां येतात त्यांचे धास्तीमुळें घरानजीक उकिरडे वगैरे घाण लोक काढून टाकित आहेत. हल्लीं गाव नेहेमीपेक्षां स्वच्छ व सुशोभित दिसतें व याहूनही ज्यास्त दिसेल यांत संशय नाहीं. यात्रेकरितां येणारे लोकांची सुरुवात झाली. पोलिसखात्याचे अधिकारी मिस्तर हापसन साहेब आले आहेत हे मराठी भाषा शास्त्रीलोकांप्रमाणें शुध्द बोलतात असें ऐकतो. हे साहेब आपले कामीं दक्ष असल्याकारणानें यावेळेत बंदोबस्त उत्तम राहील असा अदमास आहे. पोलिस सुपरइंटेंडंट साहेबांनीं आपल्या खात्यांतील निवडक व हुशार लोक इकडे पाठविले आहेत. त्यांत मिस्तर कालिन साहेब, रा. रा. बाळकराम इन्स्पेक्टर, वामनराव कोर्ट इन्स्पेक्टर, चोमसिंग चीफ कान्स्टेबल वगैरे आहेत याच गृहस्थांची दरवर्षीं बहुशा या जत्रेचे वेळीं नेमणूक होते यावरून हे हुशार आहेत हें सांगणें नकोच. सदरहू कोर्टइन्स्पेक्टर साहेबांनीं येथील मुलीचे शाळेची परिक्षा तारीख १२ रोजीं घेतली मुलींचा अभ्यास पाहून खुष होऊन मुलींस मिठाई वाटल्याचें ऐकतों मेहेरबान एलियट साहेब असिस्टंट कामिशनर येथें येऊन दाखल झाले, तहशिलदारही एक दोन दिवसांत येणार ह्मणून ऐकतो, गाव सफाईचे कामीं सरकारांतून आणि गावकरी लोकांकडून मोठा सपाटा चालला आहे गेल्या रविवारीं देवाची घटस्थापना होऊन सायंकाळीं आरती झाल्यावरती दसऱ्याचे दिवशीं जी दारू श्री बालासाहेबाचेपुढें सुठते ती कशी आहे हें पाहण्याकरितां कांहीं नळे वगैरे सुटले. पाहणाऱ्या मंडळीनीं कांहीं नळे फार चांगले झाले ह्मणोन सांगितलें. पत्रविस्तारास्तव आतां पुरे करितो पुढील खेपेस जे पाहण्यांत येईल तें कळवीन.

## वर्तमानसार

मि. हावलाक साहेब दक्षिण भागचे रिविन्यु कामिशनर १७ महिन्यांची रजा घेऊन विलायतेस जात आहेत.

आनरबल होबर्ट साहेब खानदेशचे जडज विलायतेस गेले त्यांचे जागेवर मि० डानियल साहेब ठाण्याचे नाइट जडज यांस नेमिलें व त्यांच्या जाग्यावर मि० बर्डउड साहेब यांस नेमिलें,

सातारचे कलेक्टर मि० आर्थर साहेब यांस १२ महिन्यांची रजा मिळाली.

खानदेशांतील जळगाव येथें मुळजी जेठा आणि कंपनी यांचे सूत काढण्याचें व कापड विणण्याचें यंत्र मांडण्याची तयारी चालली होती ती सर्व पुरी होऊन गेल्या सोमवारीं सूत काढण्याची यंत्रें चालू केलीं. कापड विणण्याचींही इतक्यांत सुरू होतील. या सुरवातीच्या समारंभाकरितां मुंबईहून मुळजीचे चिरंजीव शेट सुंदरभाई जळगावास आले होते. त्यांनीं गृहस्थ मंडळीस पान सुपारी आणि भिक्षुकांस दाक्षिणा व सर्वांस मिठायी वाटली. पांच चार शें लोक सुताचें यंत्र चालण्याची मौज पाहण्यास जमले होते व त्यांनां तें पाहून मोठें आश्चर्य वाटलें!

मिस्तर पेस्तमजी जहांगीर उत्तरभागचे सेटलमेंट आफिसर १२ महिन्यांची रजा घेऊन बडोदेदरबारीं गेले. त्यांस तिकडे २ हजार रुपये पगार मिळणार असें ह्मणतात.

रा. ब. कृष्णाजी लक्ष्मण कच्छ प्रांतीं गेल्यानें मुंबईच्या स्माल काज कोर्टांत जागा रिकामी झाली ती मि० होर्मसजी दादाभाई वकील यांस मिळाली.

ब्रह्मदेशांत बंगाल्यांतील दुष्काळाकरितां आजपर्यंत ७०८०९ रुपये जमले.

सन १८७३–७४ सालच्या नागपुर इलाख्यांतील धर्मार्थ दवाखान्याच्या रिपोर्टावरून समजतें कीं ह्या इलाख्यांत एकंदर ७८ दवाखाने आहेत. व सन १८७३–७४ सालीं असिरगड येथें १ दवाखाना नवीन झाला. नागपुर व जबलपुर येथील नवीन हस्पिटलाची बरीच सुधारणूक झाली. ह्या सालांत सर्व प्रांतांतील लोकांत चांगलें आरोग्य होतें. सन १८७२–७३ सालामध्यें जीं मनुष्यें मेलीं त्यांच्या संख्येशीं ह्या सालांतील संख्या ताडून पाहिली असतां ह्यासालीं फार थोडीं मनुष्यें मेलीं असें दिसून येतें.

ह्यासालीं ह्या इलाख्यांत फक्त दोन जिल्ह्यांत मात्र पटकीचा थोडा थोडा उपद्रव झाला. परंतु देवीची साथ मात्र सर्व जिल्ह्यांतून होती, व कित्येक ठिकाणीं ही फार घातुक झाली.

धरमपुरच्या राजाची बायको मरण पावली. तिच्या सुतकाकरितां १९ दिवस दरबार बंद होतें.

उत्तर बंगाल रेलवेकडे २२ युरोपियन गृहस्थ आहेत त्यांतील १३ जण आजारी आहेत व २ हवा बदलण्याकरितां बाहेर गेले आहेत!

बंगाली पुष्कळ लोक व्हालंटियर पलटण सजविण्याचे उद्योगांत आहेत.

गोकुळदास तेजपाळ यांनीं धर्मार्थ नवीन इस्पितळ तयार केलें तें पाहिले ता रखेपासून नेटिव लोकांच्या उपयोगांत आलें.

उदेपुरचे महाराणे मरण पावले.

इंदुराकडील सादतखान बंडवाला यानंतर अपराध शाबीद होऊन त्यास फाशीं दिले.

सिंधू नदीचा दरा व उत्तर पंजाब इकडे होणारे नवीन रेल्वे कमी प्रमाणाचे न करितां पूर्वी प्रमाणें ५॥ फूट अंतराचे करावे ह्मणजे प्रसंग विशेषीं फौजा वगैरे नेण्या आणण्यास सोइवार पडेल असें लार्ड सालिस्बरी यांनीं ठरविलें आहे.

मद्रास रेल्वेनें हिंदुस्थान सरकारास बेलारीपासून गदगपर्यंत रेल्वे करण्याविषयीं सांगशन मागितलें आहे. पण तें मिळेल असें वाटत नाहीं.

गेल्या महिन्यांत बडोद्यास गायकवाड सरकारचा एक हत्ती मोकळा सुटला व त्यानें रस्त्यांत मस्ती करून ९ मनुष्यें जखमी केलीं.

कृष्णानदीला मोठा पूर येऊन मच्छलीपट्टणाचा कालवा वाहून गेला. दयी ला नावाची नदी आहे ती फुगली तेव्हां कित्येक जिवांचा नाश झाला. कांहीं गावांत पांच फूट पाणी झालें होतें. व अन्नावाचून तीन दिवस लोक उपाशी होते व टपाल बंद झालें होतें.

बंगालइलाख्यांत पिकें फार चांगलीं आलीं आहेत. सर रिचर्ड टेंपल साहेब पाटणा येथें दुष्काळाकडील कामदार लोकांच्या भेटी घेण्याकरितां गेले आहेत. दुष्काळ प्रकरण आतां लवकरच निःशेष होईल.

नेपाळचे सर जंग बहादुर कलकत्यास गवरनरजनरल साहेबास भेटण्याकरितां आले आहेत. व ते पुढें मुंबईसही येणार आहेत.

मुंबईच्या गवरनर साहेबाचे चिरंजीव मुंबईस आले त्यांस त्यांनीं आपले प्रायव्हेट सेक्रेटरी नेमिलें. व पहिले प्रा० सेक्रेटरी मि० ली वार्नर साहेब यांस अमदाबादेस सेकंड असिस्टंट कलेक्टर नेमिलें.

जयपुरची स्टेट रेल्वे इतक्यांत सुरू होणार होती ती पुढील महिन्याच्या १२ वे तारखेपर्यंत तकूब राहिली आहे.

हिंदुस्थानांतील तुरुंगावरील इन्स्पेक्टर जनरल यांनीं शिफारस केली आहे कीं बंगालइलाख्यांत तुरुंगांतील ज्या स्त्रिया कामांत कुचराई करितात त्यांच्या हातांत बेड्या घालाव्या ह्मणजे त्यांनां आळशी राहातां येणार नाहीं. लेफ्टिनेंट गवरनर यानीं त्या गोष्टीस रुकार दिला.

कलकत्यास एका बाबूला मूल होत नव्हतें ह्मणून तो एका डाक्टराकडून आपले बायकोस वांझपणा घालविण्याचें औषध देत होता; पुढें डाक्टरानें त्या बायकोशीं सलगी करून तिला पळवून नेली. त्या डाक्टरास हल्लीं पकडलें आहे.

असाम प्रांतांत एका युरोपियन शेतीवाल्यानें एका चौकीदारास लाथा मारून मारून ठार केलें तो मुकद्दमा लवकरच हायकोर्टापुढें येणार आहे.

---

## ईश्वराची कृपा हेंच भक्ति व अंतःकरणशुद्धी ह्यांचें साधन

मी स्वपराक्रमें परमेश्वराची भक्ति करीन, त्याजवर प्रेम ठेवीन, त्याच्या परम महत् स्वरूपाचें चिंतन करीन असें मनांत आणून त्या उद्योगास मनुष्य लागला तर परमेश्वर आपणास साध्य होत नाहीं असें त्याच्या अनुभवास येईल. परमेश्वरावर भक्ति जडण्याच्याबद्दल प्रपंचावर त्याची भक्ति जडेल, त्याचें ध्यान करावयाचे वेळेस अन्यविषय त्याच्या मनापुढें उभे रहातील. ध्यान करावयास बसले, प्रार्थना करावयास लागले ह्मणजे लक्ष भलतेकडेसच जाऊन त्या कृत्यापासून कांहीं एक फळ न होतां तीं संपल्यावर पूर्वीं जसे शुष्क होते तशाचप्रमाणें आहेत असे मनुष्य थोडे आहेत काय? ह्या गोष्टी करतांनां जर त्यांची अशा प्रकारची स्थिति तर प्रपंच करतांनां कशी असेल ह्याविषयीं विचार करावयास नको. त्यावेळेस तर स्वाहितावरच त्यांची दृष्टि असते, अंतर्यामीं परमेश्वराची भीति नाहीं, सर्व साक्षी तो आपणाकडेस पाहत आहे हें त्यांच्या ध्यानींही नाहीं असें होतें, आणि हें खरें आहे. आपण अल्पबुद्धि मानव बाह्य विषयामध्यें आसक्त अशांस विषयातीत, चक्षुरादि इंद्रियांस अग्राह्य, अनाद्यनंत, शाश्वत अशा परम पुरुषाचें आकलन करणें आणि सदोदित त्यास अंतःकरणांत बाळगून बाह्याविषय कदाचित् मिथ्या असतील, परंतु तो मिथ्या नव्हे, तो सत्याचें परमस्थान आहे अशी दृढ श्रद्धा ठेऊन सर्व व्यवहार करणें ही गोष्ट दुष्कर आहे. त्याचप्रमाणें स्वसामर्थ्यानें मी पापापासून दूर राहून अंतःकरण शुद्ध ठेवीन, अशा समजुतीनें मनुष्य वागूं लागला, तर परिणाम चांगला होणार नाहीं, स्वाहित आणि सदाचरण ह्यांचा पुष्कळ प्रसंगीं विरोध असतो, त्या वेळेस स्वहिताचा त्याग करून सत्य जें आहे. तेंच करण्यास त्या मनुष्यास बळ व दृढनिश्चय कोठून प्राप्त होतील? अशा प्रकारें तो चालला ह्मणजे कांहीं काळानें त्याच्या उज्ज्वल सदसद्विवेचन बुद्धीवर मळ बसून ती मंद होईल, आणि जी स्वहिताची गोष्ट तीच खरी, तीच पुण्यकारक असें त्याजला वाटूं लागेल. कदाचित असे परिणाम न होतां तो लौकिक व्यवहारांत पाप करीत नाहीं, असें जरी झालें तथापि इच्छिलेली गोष्ट सिद्धीस जात नाहीं. पाप करणें वाईट आहे लोकांमध्यें त्याच्या योगें अपकीर्ति होते, तेणेंकरून मनुष्याची योग्यता कमी होते, अशाच समजुतीनें जो वागतो त्याचें अंतःकरण सुपरिशुद्ध व्हावयाचें नाहीं. जरी तो बाहेरून वाईट करीत नाहीं, तथापि त्याच्या मनांत पापाच्या कल्पना येतात. कोणत्याही इंद्रियाचा विषय दृष्टीपुढें आला, ह्मणजे पाप करून त्याचा उपभोग जरी घेतला नाहीं, तथापि त्याविषयीं सर्वथा ज्याच्या मनामध्यें पाप येत नाहीं असा मनुष्य विरळा, किंबहुना मुळींच नाहीं, आणि जोंपर्यंत अशा रातीनें पाप मनांतून अगदी गेलें नाहीं तोंपर्यंत त्या मनुष्याचा अंतर्याम शुद्ध झाला असें ह्मणतां येत नाहीं. ह्या स्थितीला उपाय काय? उपाय एकच आहे, तो हा कीं ईश्वराची कृपा आणि त्या कृपेविषयीं पूर्ण भरवसा. ईश्वर खरोखर आपला मायबाप आहे अशी दृढश्रद्धा व ह्या दृढश्रद्धेनें त्यास शरण जाणें, ह्मटलें आहे:—

नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न
बहुना श्रुतेन । यमेवैष वृणुते तेन लभ्य
स्तस्यैष आत्मा वृणुते तनुं स्वाम ॥ १ ॥

"पांडित्य कारितां आलें, प्रज्ञा चांगली असली, पुष्कळ ज्ञान संपादिलें ह्मणजे हा परमात्मा प्राप्त होतो असें नाहीं. तर तो ज्यावर अनुग्रह करितो त्याजलाच तो प्राप्त होतो, त्यालाच तो आपलें स्वरूप उघड करून दाखवितो" तसेंच:—

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच ॥

परमेश्वर ह्मणतो "सर्व धर्मांचा त्याग करून एका मलाच शरण ये; मी तुला सर्व पापांतून मुक्त करीन; तूं शोक करूं नको."

तर आपल्याच सामर्थ्यावर भरंवसा न ठेवितां आपली अशा प्रकारची दुर्बलता जाणून अति विनम्र होऊन परमेश्वरास अनन्यभावें शरण जावें, त्याच्या दयेविषयीं पूर्ण श्रद्धा अंतःकरणांत बाळगावी ह्मणजे परमेश्वराच्या अनुग्रहास आरंभ होऊन त्याचा आपणास अनुभव यावयास लागतो अनन्यभावें शरण जाऊन जो सतत अंतःकरणांत ह्मणेल कीं "देवा मी अनाथ आहे, माझी इच्छा पापी आहे, मजला तुझीच इच्छा प्रमाण. तूं माझा स्वामी, माझा खरा दयाळू मायबाप" त्यास स्वहिताचा त्याग करून जें सत्य, जें ईश्वरास मान्य तें करण्याचें धैर्य येईल आणि त्याच्या अंतःकरणांतून पापी विचार उत्तरोत्तर नाहींसे होतील. अशी स्थिति होऊं लागली "सर्व कांहीं होतें तें परमेश्वराच्या इच्छेनें होतें, माझें कल्याणच तो करील, तोच सर्व समर्थ" असा पूर्ण भरंवसा उत्पन्न झाला ह्मणजे त्याजवर अतिशय प्रेम जडेल, भक्ति प्रवृद्ध होईल, आणि परमेश्वराचा आनंदमय प्रकाश पडूं लागेल. आपल्या दुर्बलतेची खात्री होऊन परमेश्वराच्या कृपेवर, त्याच्या सामर्थ्यावर ज्याचा भरिभार, त्याजला विलक्षण बळ येतें, शांति त्याच्या अंतःकरणांत वास करिते. सर्व प्रपंच्यांत अंतःकरणास आधार ह्मणून इतके दिवस जो तो शोधीत होता तो त्यास सांपडला, आणि मग पुढें सुरळीतपणें त्याचें कालक्रमण होऊन मोक्षाचें द्वार स्पष्टपणें त्यास दिसावयास लागतें आणि आपलें स्वतांचें सामर्थ्य अल्प असून ही स्थिति प्राप्त झाली आहे तस्मात् जगदीश्वर खरा मायबाप असें त्याच्या प्रत्ययास येतें.

बाळकजाणेनामातेशीं । तिचेंमनबाळापाशीं
तैसादेवहाकृपाळु । करीभक्तांचासांभाळू ॥

सु. प.

---

## वऱ्हाडचें वर्णन

वऱ्हाडांत लोणारचें सरोवर व देवालय, इलिचपुरच्या आसपासची मोडकळीस आलेलीं जुनीं कामें, नरनाळ्याचा किल्ला, गाविलगडचा किल्ला, पेणगंगा नदीचा सहस्र कुंडावरील धबधबा इत्यादि जागा पहण्यासारख्या व लक्षांत ठेवण्या सारख्या आहेत. त्याचप्रमाणें इलिचपुरच्या ईशान्येस तीन कोसांवर एका टेकडीला मुक्तगीर ह्मणून जैन धर्माची पुष्कळ देवालयें आहेत तीं व नाहुरचा किल्लाही पहण्या सारखीं आहेत. मनुष्याचें हस्तकौशल्याचें आणि अतिशय जुनें असें काम अकोलें जिल्ह्यांत पातुरास आहे ह्मणजे तेथें एका टेकडीला आंतून पोखरून दोन मोठाले दिवाणखाने सुरेख केलेले आहेत तेथें चुना, माती, विटा, लोखंड, लाकडें यांचा लवलेशही नाहीं. याचप्रमाणें मेळघाटांत मंजिऱ्याजवळ एक डोंगर पोखरून केलेली इमारत आहे व अशींच लहान मोठीं ठिकाणें किंवा धर्मसंबंधी जागा दक्षिण भागच्या डोंगर लगत्याला पुष्कळ आहेत. व त्यांनां हेमाडपंती देवळें ह्मणतात. हेमाडपंत ह्मणून कोणी मांत्रीक होता व त्यानें भूत पिशाच्यापासून एका रात्रींत हीं अनंत कामें कराविलीं अशी आपले लोकांत दंतकथा चालत आलेली आहे. यांतील कांहीं कांहींवर लेख आहेत व मेहेरबान लायल साहेब बहादुर इकडे कमिशनर होते त्या वेळीं त्यांनीं त्यांतील कांहींचे ठसे घेऊन त्यांचा अर्थ समजण्या करितां कलकत्याला ते रवाना केले आहेत पण त्यांचें पुढें काय झालें तें समजलें नाहीं.

बुलढाण्याजवळ दोन तीन देवालयें आहेत मेहकराजवळ एक पडकें देवालय आहे, शिरपुरचें देवालय, कारंजाचें देवालय व पुसदचीं दोन देवालयें हीं ही सदरीं सांगितल्या प्रकारच्या कारागिरीचीं आहेत. राजा जयशिंग याची छत्री ह्मणून एक मोठी दगडी सुंदर इमारत बाळापुरास नदीचे काठीं औरंगजेब बादशहाचे कारकीर्दींत बांधलेली आहे. वाशिमास आणि उमरखेडास आलीकडच्या चालीचींही कित्येक सुंदर आणि मोलवान देवालयें बांधलेलीं आहेत.

बुलढाणें जिल्ह्यांत फत्तेखेलडा व रोहणखेडा येथें मुसलमान लोकांनीं बांधिलेल्या दोन उत्तम मशीदी आहेत. रोहणखेड्यास शक आहे तो सन १५८२ हा आहे ह्मणजे तिला बांधून २९४ वर्षें झालीं आहेत गाविलगडावर एक मशीद आहे व इलिचपुर शहराच्या आजुबाजूस कांहीं मुसलमानी कामें चांगलीं आहेत. तसेंच नरनाळे किल्याच्या आंतील सुंदर दरवाज्याच्या दोहो बाजूला ज्या गच्चीच्या खिडक्या आहेत त्या पहाण्या लायक आहेत. इलिचपुरच्या नवाब साहिबाचा वाडाही फार पसंत आहे. बांधकामाची कारागिरी वऱ्हाडांत हल्लीं उतरत्या कळेवर आहे तरी मे० लायल साहेब आपले ग्रंथांत ह्मणतात कीं युरोपियन कारागीर जे नेटिवांस कौशल्य शिकवू ह्मणतात त्यांच्या कारागिरीपेक्षां जुन्या काळचीं नेटिवाची कारागिरीचीं कामें सुंदर आहेत, हें त्यांचे निष्पक्षपाताचें मत पाहून आह्मांस संतोष वाटतो.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचें वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.